**सुविचार**
क्रोधी व्यक्ति वास्तव में स्वयं के साथ भी क्रोधित रहता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. २७ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८५ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# युक्रेनचा रशियावर भयानक हल्ला

मॉस्को: युक्रेन आणि रशिया मधील युद्ध जवळपास अडीच वर्षे लोटून गेली तरी अद्याप सुरूच आहे. तसेच सध्या अनिर्णितावस्थेत युद्धामध्ये असलेल्या या युक्रेनने रशियावर जबरदस्त पलटवार करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, आज युक्रेनने रशियावर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला आहे. युक्रेनने रशियाच्या saratोव्ह परिसरामध्ये एका बहुमजली इमारतीवर ड्रोनच्या माध्यमातून हल्ला केला आहे. रशियावर करण्यात आलेला ड्रोन हल्ला साधासुधा नसून अगदीच अमेरिकेच्या ९/११ च्या हल्ल्यासारखाच आहे. रशियामधील एंजेल्स हवाई तळावर ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आला आहे. युक्रेनने रशियामधल्या ३८ मजली इमारतीत ड्रोननं हल्ला केला आहे.

आज (२६ ऑगस्ट) युक्रेननं रशियातील ३८ मजली उंच इमारतीवर ड्रोननं उडवून हल्ला केला. युक्रेनचे ड्रोन थेट इमारतीत घुसलं. या ड्रोनच्या धडकेनं किमान २ जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना व्होल्गा स्काय या सेराटोव्ह शहरातील सर्वात उंच ३८ मजली इमारतीची आहे. त्याचा व्हिडीओही व्हायरल होत आहे. व्हायरल होणाऱ्या व्हिडीओनुसार, एक ड्रोन उडताना दिसत आहे, ते ड्रोन थेट ३८ मजली इमारतीत घुसलं आणि आग लागली. इमारतीच्या काही काचा फुटल्यानं खाली उभ्या असलेल्या २० हून अधिक वाहनांचंही नुकसान झालं आहे.

या युद्धाच्या सुरुवातीच्या काळात रशियाने युक्रेनमधील बहुतांश भाग तुफानी हल्ले करून खाक करून टाकला होता. मात्र नंतर युक्रेनने दणक्यात लढून रशियाला प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली होती. युक्रेनकडून रशियावर मागच्या काही दिवसांपासून सातत्याने ड्रोनच्या माध्यमातून हल्ले केले जात आहेत. दरम्यान, आज युक्रेनने रशियावर जबरदस्त प्रहार करत रशियाला या युद्धात सहजासहजी बाजी मारू देणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

मात्र, युक्रेनला या हल्ल्याची जबर किंमत मोजावी लागू शकते. असा दावा आंतरराष्ट्रीय संरक्षण तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. तसेच या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून रशिया युक्रेनवर मोठा हल्ला करून पुन्हा पलटवार करू शकतो. दरम्यान, युक्रेनने मागच्या आठवड्यात रशियावर असाच ड्रोन हल्ला केला होता. त्यावेळी ४५ ड्रोन युक्रेनने रशियाच्या दिशेने पाठवले होते. मात्र हे सर्व ड्रोन रशियाने नष्ट करून टाकले होते.

# शिवाजी महारांजाचा पुतळा कोसळला

सिंधुदुर्ग : प्रतिनिधी- मालवणमधील सिंधुदुर्ग राजकोट किल्ल्यावर असलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्याची घटना आज दुपारी घडली. पुतळा कोसळल्याने शिवप्रेमी संतप्त झाले आहेत. ४ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. निकृष्ट बांधकामामुळे हा शिवरायांचा पुतळा कोसळ्याचाा आरोप शिवप्रेमी करत आहेत. येथील शिवपुतळा परिसर सुशोभीकरणासाठी सुमारे ५ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता.

राजकोट येथील शिवपुतळा संकुलाचे सुशोभीकरण व इतर व्यवस्थेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली यांच्या कार्यालयाकडून सुमारे ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. राज्य सरकार आणि नौदल विभागाने निर्णय घेतल्यानंतरच राजकोट येथे पुतळा उभारण्याचे काम सुरू झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सुमारे ४३ फूट उंच आहे. जमिनी पासून बांधकाम १५ फूट तर त्यावर २८ फूट उंच हा पुतळा उभारण्यात आला होता.

दोषींवर कारवाई करा: वैभव नाईक

दरम्यान, या घटनेवर ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक म्हणाले की, शिवाची महाराजांचा पुतळ हा निकृष्ट कामामुळे कोसळल आहे. याबद्दल आम्हाला दु:ख होत असून, एक शिवप्रेमी म्हणून आम्ही याचा निषेध करतो. सहा महिन्यांपूर्वी कोट्यावधी रुपये खर्च करून हा पुतळा उभरण्यात आला होता . ज्यावेळी काम सुरू होते त्यावेळी स्थानिक लोकांनी सुद्धा कामासंदर्भात तक्रारी केल्या होत्या. ४०० वषार्पूर्वी उभारण्यात आलेल्या किल्ल्याचा एकही चिरा ढासळला नाही, पण सहा महिन्यांपूर्वी बांधण्यात आलेला पुतळा ढासाळला. या प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल झाले पाहिजे अन्यथा आम्ही राज्यभर आंदोलन करू. तसेच सर्व शिवप्रेमींनी शांततेत आंदोलन करावे, असे आमदार वैभव नाईक म्हणाले.

## नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे निधन

शासकीय इतमामात आज अंत्यविधी



**शिवानंद स्वामी**

नांदेड: प्रतिनिधी- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे निधन झाले. वयाच्या ६४ व्या वर्षी वसंतराव चव्हाण यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. ते मागील काही दिवसांपासून आजारी होते. यामुळे त्यांना आधी नांदेडच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांची प्रकृती अधिक ढासळली यामुळे त्यांना एअर ॲम्ब्युलन्सने हैदराबादच्या किम्स रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. चव्हाण यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपमध्ये गेल्यानंतर नांदेड काँग्रेसमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता कमी करून पक्ष पुन्हा बळकट करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत नांदेड मतदारसंघात (पान ७ वर)

# मोक्षप्राप्तीसाठी वीरशैव सिद्धान्त परीक्षा महत्वाची : श्रीकाशी जगद्गुरू

## राज्यस्तरीय पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न




सोलापूर - श्रीकाशी जगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्याकडून मे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या वीरशैव सिद्धान्त प्रबोध, प्रवीण आणि पंडित परीक्षेतील राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा श्रीकाशी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या दिव्य सान्निध्यात आणि सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ड. निलेश अशोक ठोकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीवीरतपस्वी ध्यान मंदिर होटगी संस्थान, एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचीसुरुवातवेदघोषाने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून श्रीकाशी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या अमृत हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

मे २०२४ मध्ये एकूण ६००विद्यार्थ्यांनी वीरशैव सिध्दान्त, प्रबोध, प्रवीण आणि पंडित परीक्षा दिली असून ९९.८३% इतका निकाल लागला आहे. यामधील प्रत्येक परीक्षेतील ३ विद्यार्थी अशा एकूण ९ विद्यार्थ्यांना पाच हजार ,तीन हजार आणि दोन हजार रुपये रोख, प्रमाणपत्र, आणि रूद्राक्ष माळ अशा स्वरूपात पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य विद्यानंद स्वामी (पान ७ वर)

# बटेंगे तो और भी कटेंगे - योगी आदित्यनाथ



आग्रा : आपण जर धर्म, पंत, संप्रदाय आणि जातीत वाटल्या गेलो तर मोठे नुकसान होईल बटेंगे तो और भी कटेंगे (विभागल्या गेलो तर मारले जाऊ) असे सांगत उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले. आग्रा येथे कृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दुर्गादास राठोड यांच्या पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी योगी आदित्यनाथ म्हणाले की, आग्र्याच्या कणा-कणात कन्हैयाचा वास आहे. येथे कला, आस्था,समर्पण आणि विश्र्वास आहे.

समाज, जाती, भाषेवरून तोडणाऱ्या शक्तीपासून सावध राहण्याची गरज आहे. योगी यांनी राष्ट्रवीर दुर्गादास यांच्या इतिहासासोबतच काकोरी कटातील नायकांच्या के इतिहासावरही प्रकाशझोत टाकला. मुख्यमंत्री योगींनी म्हटले की, काकोरी कटातील नायक पंडित बिस्मिल यांना फाशी दिली जात होती तेव्हा इंग्रजांनी विचारले होते की, तुमची शेवटी इच्छा काय आहे. त्यावर त्यांनी म्हटले होते की, मला धरतीवरच १०० वेळा जन्म मिळावा आणि प्रत्येकवेळी देश व समाजासाठी मृत्यू यावा.

देशाच्या एकात्मतेवर बोलताना योगी म्हणाले की, ऐक्याशिवाय (पान ७ वर)

# शिवसेना संपर्क कार्यालय लातूर येथे स्व.धर्मवीर आनंद दिघे यांना अभिवादन



लातूर / प्रतिनिधी- मानवतेचे पुजारी, गुरुवर्य, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या पुण्यतिथीदिनानिमित्य लातूर येथील जिल्हा संपर्क कार्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिवसेनेचे राज्य सचिव श्री.संजयजी मोरे साहेब,मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख श्री आनंदराव जाधव साहेब, लोकसभा प्रमुख श्री बालाजीराव काकडे साहेब, जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव साहेब व जिल्हा महिला संपर्क प्रमुख सौ रंजना ताई कुलकर्णी यांचया मार्गदर्शनाखाली जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव यांच्या उपस्थितीत सोमवार दि.२६ ऑगष्ट रोजी जिल्हा शिवसेना संपर्क कार्यालय लातूर येथे शिवसेनेचे दिवंगत नेते धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्य त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.यावेळी लातूर जिल्हा संपर्कप्रमुख बळवंत भाऊ जाधव साहेब,शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन दाने , माजी जिल्हा प्रमुख प्रा.सुर्यभान जाधव , महिला जिल्हाप्रमुख कल्पनाताई बावगे , , शहर प्रमुख परवेजभाई पठाण , उपशहर प्रमुख विजयकुमार कांबळे , शहर संघटक प्रमुख ड.बालाजी सुर्यवंशी , तालुका प्रमुख तथा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जिल्हा सदस्य सदाशिव गव्हाणे , उपतालुका प्रमुख नितीन (बापू) महाजन , उपशहर प्रमुख श्रीहरी डोपे , शिव उद्योग सहकार सेना महासंघ जिल्हाध्यक्ष बळी पवार , शिव उद्योग सहकार सेना महासंघ जिल्हा सरचिटणीस बालाजी भोंग पाटील , ड.अर्जुन जाधव , युवा सेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा सरवदे , युवा सेना जिल्हा सचिव गणेश पवार , महिला बचतगट जिल्हा प्रमुख सौ वर्षाताई धडे ,उपशहर प्रमुख राजु बागवान , कामगार सेना प्रमुख शमशोद्दीन शेख , तालुका उप प्रमुख शाम साबळे , सौ शिवनंदा दानाई , गट प्रमुख श्रीमती सुरेखा बिडवे , लक्ष्मीबाई चव्हाण, आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या (पान ७ वर)

# 'मिशन साद' आरोग्य तपासणी शिबिराचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन



लातूर,/ प्रतिनिधी- : जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील श्रवणदोष असलेल्या बालकांचा शोध घेवून, त्यांच्यावर वेळीच आवश्यक उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'मिशन साद' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत प्रत्येक बालकाची आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केले.

जिल्हा प्रशासन, उमंग इन्स्टिट्यूट आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन साद' अंतर्गत आज प्रबोधनकार ठाकरे चौक येथील अंगणवाडीमध्ये तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नायब तहसीलदार गणेश सरोदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

लहान मुलांमधील श्रवणदोषाचे लवकर निदान होवून वेळीच उपचार झाल्यास या मुलांमधील श्रवणदोष दूर होवू शकतो. त्यामुळे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाची तपासणी करून घेण्यासाठी जिल्ह्यात अंगणवाडी स्तरावर 'मिशन साद' अंतर्गत आरोग्य तपसणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांनी आपल्या क्षेत्रातील प्रत्येक बालकाची (पान ७ वर)

# लातुरात नाट्य स्पंदन प्रतिष्ठाण आयोजित सभ्य गृहस्थहो नाटकाचे सादरीकरण

## नाट्य रसिक श्रोत्यांनी घेतला मनमुराद आनंद

**लातूर / प्रतिनिधी-** नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण लातुरच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर मंडळींचा सहभाग असलेल्या सभ्य गृहस्थहो नामक विनोदी दोन अंकी नाटकाचे रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी स्वर्गीय दगडोजीराव देशमुख स्मृती भवन या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचा शुभारंभ माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करून करण्यात आला.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि उपस्थित सर्व मान्यवर, नाट्य रसिकांनी सदरील नाटकाचा मनमुराद आनंद घेतला. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचे लेखन -जयवंत दळवी, दिग्दर्शक-डॉ.चंद्रकांत शिरोळे, सह दिग्दर्शक -डॉ.अभय ढगे आणि डॉ. मुकुंद भिसे, नेपथ्य - दत्तात्रय राऊत आणि डॉ. वेंकट येलाले, प्रकाश योजना-संजय आयचीत,संगीत - डॉ. अभय ढगे आणि दयानंद सरपाळे, रंगभूषा- भारत थोरात, प्रसिद्धी- डॉ. अनघा राजपूत आणि डॉ. वैशाली टेकाळे, रंगमंच व्यवस्था-गणेश पवार, नंदकुमार वाकडे, संदीप सहाणे तर या मधील कलाकार म्हणून डॉ. वेंकट येलाले, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. भागवत शेळके, डॉ.शीतल टिके, डॉ. संजय मुंडकर, डॉ.शिल्पा दडगे, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. अभिजित येलाले, डॉ.मुकुंद भिसे, डॉ.विनया बनशेळकिकर, डॉ. संदीप सहाणे, डॉ. अभय ढगे या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी



सादरीकरण केले ज्याचा रसिकांनी मनमुराद आनंद लुटला. दरम्यान यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण कडून खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना मानपत्र देऊन तसेच प्रतिष्ठाणचे मानद सदस्यत्व देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ.चंद्रकांत शिरोळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, शहराध्यक्ष अॅड. किरण जाधव, अॅड. समद पटेल, सचिन बंडापल्ले, लक्ष्मण कांबळे, कैलास कांबळे, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. अमित (पान ७ वर)

# समदर्गा येथे महिला भवन बांधकामासाठी आ.कराड यांच्याकडून २० लाखाचा निधी

लातूर / प्रतिनिधी- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे बचत गट व इतर महिलांच्या कामाकरिता सुसज्ज अद्यावत महिला भवन बांधकामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी तब्बल २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. सदरील निधी दिल्याबद्दल आणि महायुती शासनाने लाडक्या बहिणींना राखी पौर्णिमेची भेट दिल्याने आ. कराड यांचे महिलांनी स्वागत करून आभार व्यक्त केले.

राज्यातील महायुती शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत अनेक महिलांना शासनाच्या वतीने तीन - तीन हजार रुपयांचा निधी बँक खात्यात जमा झाल्याने लातूर ग्रामीण




विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथील महिलांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा रविवारी यथोचित सत्कार करून व राखी बांधून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, संभाजी वायाळ, उद्धव काळे, रवींद्र पाटील, दिगंबर तिडके यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात राज्यातील महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यासह विविध कल्याणकारी योजना सुरू करून गोरगरीब जनतेला दिलासा दिला असल्याचे सांगून समदर्गा गावातील अमरजा श्रीपाद ढोक, सुवर्णा जगन्नाथ ढोक, छाया हेमाद्रीपंत काळे, कौशल्या विष्णू ठोक, रेणुका शिवाजी काळे, वर्षाला हरिबा महाडक, (पान ७ वर)

# वैज्ञानिकांची जयंती साजरी करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांच्या हिताचा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक हान्स क्रेब यांची १२४ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम दयानंद विज्ञान महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे.याचनिमित्ताने वैज्ञानिकांच्या नाविन्यपूर्ण संशोधनामुळे विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन स्वतः बरोबरच महाविद्यालयाचेही नावलौकिक करतील असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम सुरू केला आहे.



कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,पी.आर.ओ.प्रा.बळवंत सूर्यवंशी,परीक्षा प्रमुख प्रा.विजयकुमार मांदळे,डॉ.कोमल गोमारे व प्रा.सास्तुरकर यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेला वंदन करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ.कोमल गोमारे यांनी केली.तसेच जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षांची विद्यार्थिनी पर्णवी ढवारे यांनी वैज्ञानिकाच्या संशोधन कार्याबाबतची माहिती प्रकाशझोतात आणली.

प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी यावेळी हा उपक्रम मागील दोन वर्षापासून राबविला जात असून तो विद्यार्थी हिताचा आहे.अशा या उपक्रमातून सर्वांनी काहीतरी नवीन शिकले पाहिजे.त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आज वैज्ञानिकांची माहिती देणारी पर्णवी जिने आत्तापर्यंत विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून सर्वांगीण विकास करत अनेक जिल्हा व राज्यस्तरीय पारितोषिके मिळविले आहेत,त्यासाठी तिचे मनापासून कौतुक व अभिनंदन केले. सर हॅन्स अडॉल्फ क्रेब्स हे जर्मन वंशाचे ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ,चिकित्सक आणि जैवरसायनशास्त्रज्ञ होते. ते सेल्युलर श्वासोच्छवासाच्या अभ्यासात एक अग्रणी शास्त्रज्ञ होते.जिवंत पेशींमध्ये एक जैवरासायनिक प्रक्रिया जी अन्न आणि ऑक्सिजनमधून ऊर्जा मिळवते आणि जीवनाच्या प्रक्रिया चालविण्यासाठी उपलब्ध करते. सायट्रिक ॲसिड सायकल आणि युरिया सायकल या नारोबिक सूक्ष्मजीवांव्यतिरिक्त, मानवांसह जवळजवळ सर्व जीवांच्या पेशींमध्ये होणाऱ्या रासायनिक अभिक्रियांच्या दोन महत्त्वाच्या अनुक्रमांच्या शोधांसाठी तो प्रसिद्ध आहे. पूर्वीचे, बहुधा क्रेब्स सायकल या नावाने ओळखले जाणारे चयापचय क्रियांचा क्रम आहे. ज्यामुळे ऑक्सिजन-श्वास घेणाऱ्या जीवांच्या पेशींना ग्लायकोलिसिससारख्या ॲनेरोबिक प्रक्रियांपेक्षा जास्त एटीपी मिळू शकतात आणि त्याच्या शोधामुळे क्रेब्सला १९५३ मध्ये फिजिओलॉजी किंवा मेडिसिनमध्ये नोबेल पारितोषिक मिळाले.हॅन्स कॉर्नबर्गसोबत त्यांनी ग्लायऑक्सिलेट सायकल,वनस्पती,बॅक्टेरिया, प्रोटिस्ट आणि बुरशीमध्ये आढळणाऱ्या सायट्रिक ॲसिड सायकलचा थोडासा फरक देखील शोधला.

प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात दयानंद कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# युक्ती, बुद्धी आणि ताकद यांचा त्रिवेणी संगम म्हणजे कुस्ती



ाले

कुस्ती या खेळाला जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या महाराष्ट्राला कुस्तीची एक ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. कुस्तीमध्ये खेळाडूंनी युक्ती, बुद्धी आणि ताकद यांचा त्रिवेणी संगम साधल्यास आपण ऑलम्पिक सारख्या जागतिक स्पर्धेमध्ये आपले प्रतिनिधित्व करू शकतो असा आशावाद स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे यांनी व्यक्त केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, क्रीडा विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या कुस्ती प्रशिक्षण केंद्रामध्ये अ-विभागीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, अ-विभाग सचिव डॉ. नितेश डॉ. यशवंत वळवी, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. बालाजी हालसे, क्रीडा विभाग समिति सदस्य डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. जितेंद्र देशमुख, प्रा. आशीष क्षिरसागर, विष्णू तातपुरे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. बेंबडे म्हणाले की, कुस्ती हा क्रीडा प्रकार कुस्तीगीरांच्या शारीरिक आणि बौद्धिक क्षमतांची पारख करणारा खेळ आहे. या खेळातील डाव/प्रति डाव मानवी जीवनासाठी प्रेरक असतात. महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय देऊन कुस्ती कलेला नवसंजीवनी दिली असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. नितेश स्वामी बोलताना म्हणाले की, कुस्ती या खेळा प्रकारातून जिद्द, चिकाटी, नेतृत्व, बुद्धी चातुर्य, वेळेचे व्यवस्थापन, मानसिक व्यवस्थापन या गुणांचा विकास होतो. महात्मा बसवेश्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्राने प्रचंड मेहनतीच्या बळावर लातूर पॅटर्नमध्ये कुस्तीची नवी फॅक्टरी

आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे गुणवंत विद्यार्थी, खेळाडू ,सामाजिक अभियंते, सक्षम अधिकारी घडवणारे संस्कार केंद्र आहे. शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा, संगीत, समाजसेवा, नागरी सेवा या क्षेत्रात महाविद्यालयाने अलौकिक अशा कामगिरी केली आहे. भविष्यात कुस्ती क्रीडा प्रकारातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीयस्तरावर लातूरचा नावलौकिक वाढवणारे खेळाडू तयार होतील असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी केले तर आभार प्रा. आशिष क्षीरसागर यांनी मानले. यावेळी पंच म्हणून अण्णासाहेब मुळे, रोहिदास माने, चेतन जावळे, विष्णू भोसले, शिवराज हाके, भरत कराड व विष्णू तातपुरे यांनी काम पहिले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता यासाठी बालाजी डावकरे, संतोष येचवाड यांनी परीश्रम घेतले.

# शिवयोगी सिद्धरामेश्वरांचे व्यक्तिमत्त्व

सिद्धराम सिद्धराम ।  
श्री शिवयोगी सिद्धराम ।  
विदेही श्रीसिद्धराम ।  
आत्मानंदी सिद्धराम ।। १ ।।  
सुखसागर श्रीसिद्धराम ।  
पुण्यागर श्रीसिद्धराम ।  
कृपासागर सिद्धराम ।  
षडरिपू नाशक सिद्धराम ।। २ ।।  
ज्ञानयोगी श्रीसिद्धराम ।  
शिवयोगी श्रीसिद्धराम ।  
कर्मयोगी श्रीसिद्धराम ।  
सत्य स्वरूपी सिद्धराम ।। ३ ।।  
दानशूर श्रीसिद्धराम ।  
वनसंवर्धक सिद्धराम ।  
जलसंवर्धक सिद्धराम ।  
वचन रक्षक सिद्धराम ।। ४ ।।  
लोकोद्धारक सिद्धराम ।  
सोन्नलगीतारक सिद्धराम ।  
सिद्धराम सिद्धराम ।  
श्री शिवयोगी सिद्धराम ।। ५ ।।

**– सिद्धदास, सोलापूर**  
श्रावण सोमवार  
२६/०८/२०२४




**परळी: असोसिएशन ऑफ स्मॉल एड मिडीयम न्यूज पेपर एडिटर्स, मुंबई या संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी दै.मनोगत तथा द रिंगण लाईव्हचे संपादक राजू पाटील यांची नियूक्ती करण्यात आली, त्यानिमित्त त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.उत्तमराव वाडकर साहेब, श्री.दिलीप जोशी, ईश्र्वरजींग सेंगर, योगेश तुरेराव व ईतर मान्यवर उपस्थित होते.**

# डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या रूपाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कला दालनाची निर्मिती व्हावी : खा. डॉ. काळगे

लातूर : लातुरात डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्री डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या रूपाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कला दालनाची निर्मिती व्हावी असे प्रतिपादन खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी केले.

लातूर शहरात डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने चवंडा आर्ट गॅलरीचे दि. २६ ते दि. ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून कान्हा चित्र प्रदर्शनीच्या उदघाटन सोहळ्याप्रसंगी खा. डॉ. काळगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिरुद्ध जाधव हे होते. यावेळी इस्कॉन मंदिराच्या अध्यक्षा माता मालिनी, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील, डॉ. राजकुमार दाताळ , चवंडा फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती गीताताई चवंडा, कोषाध्यक्ष डॉ. संगमेश चवंडा, डॉ. केतकी चवंडा, नागेश स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सुप्रिता पांचाळ यांच्या अच्युतम केशवम.. राम नारायण या भक्तीगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. खा. डॉ. काळगे यांच्या हस्ते कान्हा चित्र प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले.



डॉ. चवंडा आर्ट गॅलरीच्या माध्यमातून लातूरच्या कलाविश्वातील कलाकारांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध होण्यास मोलाची मदत मिळणार असल्याचे सांगून खा. डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, आपले लातूर विविध कलागुणांचे माहेरघर आहे, ही बाब सर्वज्ञात आहे. लातूरच्या भूमीत जन्मलेल्या कलाकारांना आता या आर्ट गॅलरीच्या माध्यमातून राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविण्यास मदत मिळणार आहे. चवंडा आर्ट गॅलरीच्या हा उपक्रम अतिशय अभिनंदनीय व स्तुत्य असून या फाऊंडेशनला आपल्या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी आपणही आपल्या परीने सर्वतोपरी योगदान देऊ, असे मत खा. डॉ. काळगे यांनी व्यक्त केले. प्राचार्य अनिरुद्ध जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात या आर्ट गॅलरीतील चित्र प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आलेल्या कलाकृती पाहून आपल्याला एखाद्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आर्ट गॅलरीला भेट दिल्याचा अनुभव आल्याचे सांगितले. लातूरसारख्या शहरात एवढ्या उत्कृष्ट दर्जाच्या कलाकृती निर्माण करणारे हरहुन्नरी कलाकार असून त्यांना या माध्यमातून भविष्यात त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी एक चांगले व्यासपीठ उपलब्ध झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

ॲड. जयश्रीताई पाटील यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देताना आपल्या जिवलग मैत्रिणीने , गीता चवंडा यांनी लातूरच्या कलाकारांसाठी हा आगळा वेगळा उपक्रम हाती घेतल्याबद्दल संधान व्यक्त करून त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. माता मालिनी यांनी यावेळी बोलताना भगवान श्रीकृष्ण यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे विचार व्यक्त करून या आर्ट गॅलरीमुळे अनेक होतकरू कलाकारांना स्वतंत्र मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक नागेश स्वामी यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी डॉ. रवी चवंडा फाउंडेशनच्या माध्यमातून मागच्या १२ - १३ वर्षात करण्यात आलेल्या विविध सामाजिक कार्याची माहिती दिली. हे फाउंडेशन सामाजिक कार्यात अग्रेसर असले तरी प्रसिद्धीपासून दूर होते असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कमलाकर सावंत यांनी तर आभार प्रदर्शन नागेश स्वामी यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# क्रीडा दिनानिमित्त गुरुवारी विविध स्पर्धांचे आयोजन

लातूर, - : महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मिती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी मेजर ध्यानचंद (हॉकीचे खेळाडू) यांचा दिनांक २९ ऑगस्ट हा जन्मदिन क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यामध्ये क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रचार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळांचे महत्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक - युवतीमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे यासाठी विविध उपक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणार आहेत.

या निमित्ताने २९ ऑगस्ट रोजी १८ वर्षे ते ४० वर्षे वयोगटासाठी १०० मीटर धावणे, योगासन, कॅरम, बुध्दीबळ, आर्मरेसलींग, फन गेम. ४० वर्षे ते ६० वर्षे वयोगटासाठी ५० मीटर धावणे, ३०० मी. धावणे, १ कि.मी. चालणे, खो-खो, योगासन, बुध्दीबळ, पुशअप इ. ६० वर्षेवरील वयोगटासाठी ३०० मीटर जलद चालणे, योगासन, १ कि.मी. चालणे बुध्दीबळ इ. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी ५० मी. धावणे , योगासन, लांबउडी, फनीगेम्स , इयत्ता सहावी ते आठवीसाठी ५० मी. धावणे, रिले , ३०० मी. धावणे, फुटबॉल, खो-खो, फनी गेम्स , इयत्ता नववी ते बारावी ५० मी. धावणे , रिले, ६०० मी. धावणे, फुटबॉल, खो-खो, पुशअप, सिटअप, फनी गेम्स आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमामध्ये लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू , युवक - युवतींनी व नगारिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा.

# थोर महापुरुषांचे विचार घराघरात नव्हे प्रत्येकाच्या मनामनात रुजले पाहिजेत



लातूर दि.२६ - साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्यासह अनेक मान्यवर थोर पुरुषांनी समाजाला दिशा देण्याचे मोठे कार्य केले आहे. एक दिवसापुरती त्यांची जयंती साजरी करून चालणार नाही खऱ्या अर्थाने थोर पुरुषांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात आणि मनामनात रुजले पाहिजेत असे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे लोकशाहीर साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रविवारी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते ऋषिकेशदादा कराड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच धनंजय देशमुख हे होते तर याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, माजी सभापती शिवराज सप्ताळ, विश्वासराव देशमुख, राष्ट्रवादीचे बालाजी कदम, विलास भोसले सुनील सौदागर महादू रसाळ, राजकुमार मानमोडे, गजू अण्णा राऊतराव, बाबनसाब शेख, सुरेश जाधव, धर्मराज करमुडे, विश्वनाथ कागले, राहुल कांबळे, जगन्नाथ ढवळे, जगन्नाथ धबडगे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

दीड दिवसाचे शिक्षण घेऊन साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी फकीरासह अनेक कादंबऱ्याचे लेखन केले त्यांची अनेक कथा, पोवाडे, काव्य आजही अनेकांच्या मनावर अधिराज्य करीत आहेत असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने जयंतीच्या निमित्ताने विधायक कामाचा जनसामान्यांच्या हिताचा संकल्प करून तो पुर्तीस घेऊन जावे असे बोलून दाखवले.

राज्यातील महायुती शासनाने विविध जनहिताच्या लोककल्याणकारी योजना सुरू केले आहेत नव्यानेच सुरू झालेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा प्रत्येक माय माऊलींनी अर्ज दाखल करून लाभ घ्यावा. ज्यांचे अर्ज अपात्र झाली आहेत अशा महिलांचेही अर्जांना मंजूर देण्यासाठी प्रयत्नशील आहोत लाडकी बहीण ही योजना तुमची आहे तुम्हाला मिळणारा पैसा हाही तुमचा आहे त्यामुळे या योजनेपासून एकही महिला लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी मी या योजना समितीचा लातूर ग्रामीण अध्यक्ष या नात्याने कार्यरत आहे असेही भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखवले.

या कार्यक्रमात सरपंच धनंजय देशमुख यांनी प्रास्ताविक केले जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव यांनी अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रारंभी उत्सव समितीच्या वतीने युवराज धबडगे, नारायण कदम, गोविंद कदम, देविदास गायकवाड, पुंडलिक धबडगे, राजू कांबळे, भरत कदम, कल्याण अविनाश धबडगे, गोविंद उमाप, आदित्य कदम, राजू कदम, ज्ञानोबा कदम, मारुती धबडगे, अवधूत उपाडे, शिवप्रसाद कदम, यांच्यासह अनेकांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे यथोचित सत्कार करून स्वागत केले. कार्यक्रमास खरोळा आणि परिसरातील सर्व स्तरातील नागरिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर ग्रामीणमधील रस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी आ.धिरज देशमुख यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

लातूर/प्रतिनिधी- लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पानगाव ते खरोळा पाटी, बोरगाव ते मुरुड अकोला रस्ता या रस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने सोडवा, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत केली. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याच्या कामाला गती द्या. शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव - मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढा, अशा सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.




लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक सोमवारी, दि. २६ रोजी घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी सुनीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, रेणापूरच्या तहसीलदार मंजूषा भगत यांच्यासह कृषी, परिवहन आदी विभागांचे अधिकारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी व दूरदृश्य प्रणालीद्वारे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत उपस्थित होते.

आ. धिरज देशमुख म्हणाले, लातूर ग्रामीण मतदारसंघातील पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याचे काम लवकरात लवकर होऊन दळणवळण सुरळीत व्हावे. स्थानिक नागरिक व प्रवाशांची गैरसोय थांबावी. मी वेळोवेळी बैठका घेऊन यासाठी पाठपुरावा केला आहे. हा रस्ता अपुर्ण राहिल्यास आपल्या भागाचे दूरगामी नुकसान होत आहे. यासाठी हा रस्ता कामाच्या निश्चित कालमर्यादेत पुर्ण होणे गरजेचे आहे. प्रशासनाने स्थानिक नागरिक व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधून रस्त्याचे काम पूर्ण करावे. लातूर - टेंभूर्णी महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला व मुरुड अकोला ते येडशी या रस्त्याच्या कामाचाही निर्णय तातडीने होणे गरजेचे आहे. रस्त्याची दुरवस्था, वाहतूक वर्दळ, स्थानिकांची मागणी व आंदोलन याचा विचार करून या रस्त्याच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर करून हा प्रश्न मार्गी लावावा.

शेतकऱ्यांना विमा, दुष्काळ निधी द्या

लातूर ग्रामीण मतदारसंघातील विमाधारक शेतकऱ्यांना विमा कंपनीने किरकोळ त्रुटी दाखवत विमा अनुदान नाकारले आहे. त्यामुळे कृषी विभाग व विमा कंपनीने त्या किरकोळ त्रुटी दूर करीत नुकसान भरपाईस पात्र विमाधारक शेतकऱ्यांना विमा अनुदान द्यावे. प्रशासन व विमा कंपनीद्वारे करण्यात येणारे पंचनामे व नोंदी यातील त्रुटीमुळे भविष्यात तणाव निर्माण होणार नाही, याची शासनाने दक्षता घ्यावी. तसेच, मागील वर्षी रेणापूर तालुका १०० टक्के दुष्काळी घोषित करण्यात आला असून येथील काही शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाचा लाभ मिळाला नाही. यातही तांत्रिक चुकांमुळे अनुदानापासून कोणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी आ. धिरज देशमुख यांनी केली. सध्या पावसाळा सुरू असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची एसटी बसेसअभावी गैरसोय होत असून मागणी असलेल्या गावात कायमस्वरूपी एसटी बसेस सुरू करावी, थांबे घ्यावेत, अशीही मागणी केली.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या तत्काळ सूचना

पानगाव ते खरोळा रस्ता पुर्ण करण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून कामाला गती देऊ. तसेच या रस्त्याला शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव - मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्याच्याही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. शेतकरी व प्रशासनाच्या चुकांमुळे विमा व दुष्काळी अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांच्या नुकसान अर्जांची पुनर्तपासणी करून पात्र शेतकऱ्यांना लाभ द्या. ढगफुटीच्या कारणाने पीकविमा नाकारलेल्या शेतकऱ्यांचे वैयक्तिक पंचनामे करून त्यांना लाभ द्या. जेथे मागणी असेल तेथे बससेवा सुरू करण्याची कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या.

यशवंत
धाराशिव
जिल्हा
मंगळवार दि. २७ ऑगस्ट २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## उद्या धाराशिव शहरात हिंदू समाजाचा रौद्र मोर्चा

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – बांगलादेशात काही दिवसापूर्वी निर्माण झालेल्या अस्थिरतेमध्ये अनेक हिंदू कुटुंबांना अन्याय अत्याचाराला बळी पडावे लागले आहे. त्यातून अनेक निष्पाप लोकांच्या हत्या झाल्या तर अनेकांची घरे उध्वस्त होऊन संसार उघड्यावर आले. बांगला देशातील हिंदूंच्या बाबतीत भारतातील हिंदूंमध्ये निर्माण झालेला असंतोष व्यक्त करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने दि.२८ ऑगस्ट रोजी धाराशिव शहरात हिंदू रौद्र मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजन समितीचे ऍड विक्रम साळुंखे यांनी दि.२६ ऑगस्ट रोजी दिली. धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना ॲड. साळुंखे म्हणाले की, हिंदू समाजाच्या या भीषण परिस्थितीबद्दल भारतीयांच्या मनात असलेला असंतोष संघटित करून त्याला रस्त्यावर उतरवून मोर्चात रूपांतर करण्यात आले आहे. हा मोर्चा सकाळी १० वाजता राजमाता जिजाऊ यांचा आशिर्वाद घेऊन त्यांच्या चौकातून या मोर्चाला सुरुवात होणार आहे. धाराशिव शहरातील लेडीज क्लब, अंबाला हॉटेल, पोस्ट कार्यालय, काळा मारुती चौक, देशपांडे गिरणी, ताजमहल टॉकीज, छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावरून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार आहे. बांगलादेशातील हिंदूंचे पुनर्वसन करावे आणि हिंदूवरील अत्याचाराला बळी पडलेल्या नागरिकांच्या पाठीशी भारत सरकारने उभे रहावे यासाठी दबाव आणावा या हेतूने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या मोर्चात धाराशिव शहर व परिसरातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ,असे आवाहन साळुंखे यांनी केले.

# घरकुल बांधकामात आकांक्षीत जिल्ह्यात धाराशिवची देशात भरारी - डॉ. ओंबासे

## आरोग्य व पोषणची कामगिरी तिसऱ्या स्थानी




धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – केंद्र सरकारच्या माध्यमातून देशातील ११२ अतिमागास जिल्ह्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी २०१८–१९ पासून पावले उचललेली आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचीनुसार जिल्ह्याने कृषी व शिक्षण विभागात भरीव प्रगती साधली आहे. तर मागील वर्षभरात आरोग्य व पोषण यावर भर दिला असून त्यामध्ये देशात तिसरे स्थान मिळविले आहे. तसेच मूलभूत गरज असलेल्या निवारा म्हणजेच घरकुल बांधकामात जिल्हा अव्वल असून देशात गरुड भरारी घेतली असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी दि.२६ ऑगस्ट रोजी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन कक्षात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत, जिल्हा कौशल्य विकासचे प्रभारी सहाय्यक आयुक्त संजय गुरव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ ओंबासे म्हणाले की, धाराशिव जिल्हा मागास म्हणून केंद्राच्या यादीमध्ये प्रविष्ट करण्यात आला होता. या जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने शासनाने विविध इतर घटकावर लक्ष देऊन त्यामध्ये प्रगती करण्यासाठी विविध योजना राबविण्यास प्राधान्य दिले असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे आकांक्षीत जिल्हाचा विकास प्रगती करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत येत असून जिल्ह्यातील सीएससी केंद्र व सर्व ग्रामपंचायत इंटरनेटने जोडल्या असल्याचे त्यांनी नमूद केले. तर जिल्ह्यातील महिलांच्या शरीरामध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी कमी होते. त्यामुळे आयर्न गोळ्या देण्याबरोबरच इतर अत्यावश्यक औषधोपचार देखील संबंधित महिलावर करून त्यांना सुदृढ बनविले आहे.

### लडकी बहीण योजनेत राज्यात प्रथम

मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेंतर्गत नारीशक्ती दूध ऍपवर १ लाख ७९ हजार ९२० तर पोर्टलवर सादर केलेले १ लाख ७६ हजार ७५३ असे ३ लाख ५६ हजार ६६३ महिलांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी नारीशक्ती दूध ऍपवरील १ लाख ७५ हजार ७९१ तर पोर्टलवरील १ लाख ५७ हजार ७८१ हजार असे एकूण ३ लाख ३३ हजार ५७२ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात दि.६ ऑगस्टपर्यंत १ लाख ३९ हजार महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये अनुदानाची रक्कम जमा केली असून उर्वरित महिलांच्या खात्यावर दि.३१ ऑगस्टपर्यंत अनुदानाची रक्कम जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अद्यापही उर्वरित महिलांनी अर्ज दाखल करावेत असे आवाहन केले. विशेष म्हणजे या योजनेची अंमलबजावणी अतिशय प्रभावीपणे केली असल्यामुळे आपला जिल्हा महाराष्ट्रात पहिल्या स्थानावर असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री व यशस्वी योजने अंतर्गत ६५ वर्षे वयाच्या पुढील जेष्ठ नागरिकांना शासनाच्या वतीने दर महिना ३ हजार रुपये देण्यात येतात. आजपर्यंत जिल्ह्यातील ७ हजार ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळवून दिला आहे. उर्वरित नागरिकांनी आपली नोंदणी समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वस्तीगृहात करावी असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून १२ वी, आयटीआय, पदविका, पदवी व पदवीधर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इच्छूक बेरोजगारास शासकीय व खासगी आस्थापनामध्ये मनुष्यबळाच्या ५ टक्के सामावून घेण्यात येत आहे. जिल्ह्यात शासकीय आस्थापनेमध्ये ४३४८ तर खाजगी आस्थापनेमध्ये २५२ जणांना सामावून घेतले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच ज्या खाजगी आस्थापनेमध्ये २० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी संख्या आहे त्यांनी जिल्हा प्रशासनाची परवानगी घ्यावी असे आवाहन केले.

### आकर्षक फलक, बोलके देखावे.......

## विविध कलाकृतीतून अण्णाभाऊ साठेंची जल्लोषापूर्ण मिरवणूक

मुरुम दि.२६ (प्रतिनिधी) – अलीकडच्या काळात महापुरुषांच्या जयंतीनिमित्त उत्सव समिती, मंडळे विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. यात सामाजिक, सांस्कृतिक यासह विविध कार्यक्रमांना आवर्जून महत्व दिले जाते. तसेच महापुरुषांच्या मुर्तीची शहरातून मिरवणूक काढून जल्लोष साजरा केला जातो. यंदा मात्र मुरुम शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अनुषंगाने शहरातील मुख्य मार्गावरून मिरवणूक दि.२५ ऑगस्ट लावा रोजी सायंकाळी साठे चौकातून निघाली. प्रारंभी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, पोलीस उपनिरीक्षक नवनाथ गाडेकर यांच्या हस्ते साठे यांच्या मूर्तीस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बबन बनसोडे, पंकज बनसोडे, लखन देडे, बंडू कांबळे, राजेंद्र देडे, अमित देडे, किरण देडे, तुळशीराम देडे, रघुनाथ बनसोडे, विनायक देडे, सचिन जाधव, शंकर पाटोळे, गुलाब क्षीरसागर, ईश्वर क्षीरसागर आदींनी पुढाकार घेतला. हलग्यांच्या कडकडाटात डीजेच्या तालावर तरुणाईने विविध चौकात कलाकारांनी आपली नृत्यकला दाखवली. अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीतील विशेष देखावा शहरवासीयांच्या कौतुकाचा विषय बनला होता. देखाव्यात अण्णाभाऊ म्हणायचे...पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नसून कष्टकरी शेतकऱ्यांच्या श्रमिकांच्या हातावर तरलेली आहे...असे फलक, फिरत्या पृथ्वीचा देखावा, देशभरात होत असलेल्या महिलांवरील अत्याचारांबद्दलचे निषेधाचे फलक तर मागील ट्रॅक्टरमध्ये अण्णाभाऊ साठेंची पूर्णाकृती मुर्ती व त्याच्या बाजूला अण्णाभाऊ साठेंनी आपल्या




तेजोमय आयुष्यात लिखाण केलेल्या साहित्यांचे फलक दोन्ही बाजूने लावण्यात आले होते. याशिवाय मूर्तीच्या मागील बाजूस भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिकारक वीर लहुजी साळवे यांचे फोटो व संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अनेक महापुरुषांचे फोटो महाराष्ट्राच्या नकाशात देखाव्याच्या रुपाने अण्णाभाऊ साठेंच्या चरित्र व विचारांचा जागर करण्याचे काम जयंती उत्सव मंडळाने केले. यंदा काढण्यात आलेल्या मिरवणुकीतील आकर्षक देखावे हे शहरातील नागरिकांच्या कौतुकाचा विषय बनला होता.

## फ्लाईंग किड्स स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त सज्जा स्पर्धा



धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – शहारातील प्लाईंग किडस् इंटरनॅशनल इंग्लीश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने जिल्हा संस्कार भारती समिती व प्लाईंग किडस् इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकृष्णरूप सज्जा स्पर्धा पार पडल्या.

धाराशिव तालुक्यातील जाधव रोड येथील स्कूलमध्ये पाहुण्यांच्या हस्ते श्रीकृष्ण प्रतिमेचे पुजन व आरती करण्यात आली व शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या गीतावर समुह नृत्य सादर करुन दहिहांडी फोडण्यात आली. नर्सरी ते ५ वी पर्यंतच्या एकूण ६० स्पर्धकांनी सहभाग स्पर्धेत सहभाग नोंदविला. या स्पर्धेत नर्सरी प्रथम अर्जुन आदित्य पाटील, द्वितीय रघुवीर सचिन पेठे, तृतीय समजीत जाधव, युकेजी प्रथम राजवीर राहूल लंगडे, द्वितीय मल्हार विवेक मुंडे, तृतीय ओम परमेश्वर राठोड इ. १ ली प्रथम, द्वितीय अभिमन्यु व्हटकर, तृतीय कार्तिक सुरवसे, सिध्दी पेठे इ .२ री अभय पवार, राजवीर धाबेकर, विनायक घोणे, इ. ३ री अनुजा कांबळे, सिद्धी संकपाळ, गितीका पवार इ. ४ थी आर्यन गायकवाड, समीहा तांबोळी, धनश्री कांबळे इ.५ वी संध्या पेठे, प्रणया पेंदे व बासरी वादन केल्याबद्दल गणेश यादुराव यांना देवगिरी प्रांत चित्रकला विधाप्रमुख शेषनाथ वाघ, संस्कार भारतीचे जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, शहराध्यक्ष शरद वडगावकर, जिल्हा संगीत प्रमुख सुरेश वाघमारे, प्राचार्य चंद्रमणी चर्तुवेदी, सदस्य अनिल मालखरे यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी जिल्हा कार्याध्यक्ष अनिल ढगे, जिल्हा सचिव प्रभाकर चोराखळीकर, धनंजय कुलकर्णी व सदस्य, प्रशालेचे कलाध्यापक जगदीश सुतार, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनींनी केले.

## प्रा. मोटे भरीव योगदानाबद्दल विशेष पुरस्काराने सन्मानित



उमरगा दि.२६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महेश मोटे यांना साप्ताहिक विश्वविनायक न्यूज रिपोर्टरचा शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारितेमध्ये केलेले विविध सामाजिक उपक्रम, विविध कार्यक्रमाद्वारे सामाजिक प्रबोधन, अंधश्रध्दा निर्मूलन, पत्रकारितेमधून वेगवेगळ्या सामाजिक विषयांना वाचा फोडून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. उमरगा येथील श्रीराम मंगल कार्यालयात आ ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, मानपत्र, शाल व वैचारिक ग्रंथ भेट देऊन डॉ. मोटे व त्यांच्या पत्नी मीरा मोटे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष लातूरच्या बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, शिवसेना (शिंदे) चे मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, सोलापूर आकाशवाणीचे निवेदक नितीन बनसोडे, दैनिक पुण्यनगरीचे वृत्त संपादक धनंजय रणदिवे, भाजपचे तालुकाध्यक्ष शहाजीराजे पाटील, महाराष्ट्र लोकविकास मंचचे अध्यक्ष विश्वनाथ तोडकर, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष कैलास शिंदे, श्रीक्षेत्र अचलबेट देवस्थानचे हभप हरी गुरुजी लवटे महाराज, विश्वविनायक न्यूज रिपोर्टरच्या मुख्य संपादिका प्रियंका गायकवाड, कार्यकारी संपादक विकास गायकवाड आदी उपस्थित होते.

# खाजगी सावकाराच्या जाचास कंटाळून अनेक कुटुंबे आत्महत्या करण्याच्या तयारीत

## फायनान्सच्या वसुलीचा तगादा तात्काळ थांबवा



धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – गावातील सावकाराकडून काढलेले कर्ज फेडण्यासाठी फायनान्सचे कर्ज काढले. त्यातच महिलांचे उद्योग व्यवस्थित चालत नाहीत. सावकाराचे घेतलेले कर्ज दुपटीने फेकले आहे. तर काहीजणींनी सोने देखील सावकाराच्या गहाण ठेवलेली सावकार आमचे पैसे द्या असे म्हणत रात्री अपरात्री घरी येऊन बसत आहेत. त्यामुळे मानसिक संतुलन खचून जात असून संबंधित महिला आत्महत्या करण्याच्या मनस्थितीत आहेत. या त्रासापासून आमची सुटका करावी. तसेच फायनान्स कंपन्यांकडून वसुली करण्यास तात्पुरती स्थगिती मिळवून द्यावी अशी, मागणी संबंधित फायनान्स व सावकाराच्या व्याजाने त्रस्त झालेल्या पुरुष व महिलांनी एका निवेदनाद्वारे दि.२६ ऑगस्ट रोजी केली आहे. दरम्यान ते सावकार अधिकृत नसून अडलेल्या गरजूंची प्रचंड आर्थिक लूट करीत आहेत.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव तालुक्यातील पळसप येथील राणी रमेश मगर व रमेश सोपान मगर, कविता श्याम चौधरी, विमल सोमनाथ साबळे व मन्सूर अली शेख यांनी भारत फायनान्स, चैतन्य फायनान्स, ग्रामीण कुट्टा, बी.एस.एस. फायनान्स, आयआयएमएल फायनान्स, सिद्धिविनायक फायनान्स, इसाफ फायनान्स, कमल फायनान्स, प्रदक्षणा फायनान्स, रूपामाता फायनान्स, एल अँड टी फायनान्स यांच्याकडून वेळोवेळी कर्ज घेतलेले असून त्यापैकी काही रक्कम भरणा केलेली आहे. तर काही फायनान्सचे कर्ज भरणा करण्याचे बाकी राहिलेले आहे. त्यामुळे त्या फायनान्सचे कर्मचारी त्यांच्या घरी घरी जाऊन बसून सकाळपासून ते रात्रीपर्यंत थांबून पैशाची मागणी करतात. उद्धट वागतात, फाशी घ्या म्हणतात, तुम्ही हफ्ते जर नाही भरले तर तुमचे जगणे मुश्किल करून टाकू. तसेच वाईट नजरेने महिलांकडे बघतात.

कविता श्याम चौधरी व विमल सोमनाथ साबळे यांनी वरील फायनान्स कडून कर्ज घेतले आहे. त्या कर्जाचा भरणा देखील केलेला आहे. तर काही फायनान्सचे कर्ज भरण्याची बाकी राहिलेले आहे. मात्र त्या फायदांचे कर्मचारी सकाळ – संध्याकाळ सतत घरी येऊन रकमेची मागणी करीत आहेत. त्या महिलांचे छोटे मोठे सुरू असलेले उद्योग अडचणीत आल्यामुळे ते हप्ते भरण्यास असमर्थ ठरत आहेत. त्यामुळे संबंधित महिलांचे कर्ज वसुली तात्पुरती स्थगिती देऊन कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या त्रासापासून त्यांची सुटका करावी अशी मागणी केली आहे.

## सावकारापासून मुक्ती देण्याची मागणी

अंजूम शेख यांनी गावातील सावकार सुरेश मोहन फुटाणे यांच्याकडून साडेचार लाख रुपये १० रुपये टक्क्यांनी व्याजाने घेतलेले होते. फुटाणे यांना रोख रक्कम, गुगल पे व फोन पे वरून वेळोवेळी भरणा करून कर्ज फेडले आहे. मात्र हे आणखी ५ लाख रुपये देण्याची मागणी करीत आहेत. तर दुसरे सावकार विजय बाबुराव शिंदे यांच्याकडून अडीच लाख रुपये १० टक्के रुपये व्याजाने घेतले होते. त्यांची देखील सर्व रक्कम परतफेड केली असून आणखीन ३ लाख रुपये देण्याची मागणी करीत आहेत. तसेच रमेश व राणी रमेश मगर या पती–पत्नींनी प्रभाकर लाकाळ यांच्याकडून २ लाख ५० हजार रुपये १० टक्क्याने व्याजाने घेतले होते. त्या कर्जाची परतफेड रोख रक्कम, फोन पे गुगल पे द्वारे केली आहे. मात्र ते सावकार आमची ९ लाख रुपये बाकी राहिले असून ती रक्कम देण्याची मागणी करीत आहेत. तर राणी व रमेश मगर यांनी सुरेश मोहन फुटाणे यांच्याकडून अडीच लाख रुपये १० रुपये टक्क्यांनी व्याजांनी घेतले होते. त्यापोटी १० ग्रॅम सोन्याची अंगठी, दीड तोळ्याचे गंठण, एक तोळे कानातील फुले असे ४ तोळे सोने गहाण ठेवले. तर कर्जाची परतफेड रोख रक्कम, गुगल पे व फोन पे वरून केलेली असताना देखील ते सावकार १४ लाख रुपये देण्याची मागणी करीत आहेत. सावकार व फायनान्स कंपनीच्या त्रासाला कंटाळून रमेश मगर यांनी दि.३१ जुलै रोजी रोगर विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. पैशाच्या मागणीसाठी संबंधित सावकार व फायनान्स कंपनीचे कर्मचारी वारंवार फोन करतात फोन नाही उचलल्यास घराकडे माणूस पाठवून देतात. त्यामुळे फायनान्सचा हप्ता व सावकाराचा तगादा यामुळे संबंधित कर्जाच्या दबावाखाली पिचलेले, दबलेले व भरडले जात असलेल्या व्यक्तींना जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

# संपादकीय

## कायद्यानेच गुन्हेगारीला आळा घालता येईल?

पुण्याच्या ससून रुग्णालयाचे निघालेले धिंडवडे हे थेट प्रमुखापासून रक्त बदलणाऱ्या वॉर्ड बॉयपर्यंत पोहोचले होते. ललित पाटील पलायन हाही विषय जुना नाही. निवासी डॉक्टरांना मिळणारी अमानवी गलिच्छ निवासी व्यवस्था हा तर त्यांच्या दर दोन वर्षांनी होणाऱ्या संपाचा प्रमुख विषय. यातूनच गेलेले डॉक्टर रुग्णालयांचे प्रमुख बनतात तेव्हा ते का निब्बर बनतात हा खरा प्रश्न. तीच गोष्ट विनयभंग व बलात्काराची. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी बलात्कार झालेल्या पीडितेची तपासणी करताना टू फिंगर टेस्टफ, वापरू नये ती चुकीची आहे असा आदेश कोर्टातर्फे द्यावा लागतो आणि तो अजूनही पाळला जातो की, नाही याची चौकशी अधिकाऱ्यांना माहिती नसते, तर कायदे कसले कसले करणार? आणि ते कोण व कसे राबवणार हा प्रश्न उभा राहतो.

डॉ. श्रीराम गीत - वैद्यकीय अभ्यासक

पुण्यात दोनशे खाटांच्या एका मोठ्या रुग्णालयात ५० वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगात टॉन्सिलचे ऑपरेशन करायला चालत नेलेला सहा वर्षांचा मुलगा भूल देताना ऑपरेशन टेबलवर गेला. ही बातमी विभागप्रमुख व रुग्णालय प्रमुखांपर्यंत पाच मिनिटांत पोहा-चली. त्यांनी मुलाच्या आई-वडिलांना स्वतः हाताला धरून ऑफिसमध्ये घेऊन नेले. काय घडले, कसे घडले व असे कसे घडू शकते याची योग्य त्या सांत्वनपर शब्दाचा वापर करून माहिती दिली गेली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रसंगामध्ये ऑपरेशन थिएटरमध्ये काम करणाऱ्या कोणत्याही ज्युनियर डॉक्टरचा चुकून सुद्धा संबंध त्या दोघांनी येऊ दिला नाही. एक फार मोठी दुर्घटना टाळण्यात या अशा वर्तणुकीचा फायदा झाला.

तीस वर्षांपूर्वी पुण्यातील डेक्कन जिमखान्यावर जवळच असलेल्या शंभर खाटांच्या रुग्णालयात ४० वर्षांचा अपघातात पायाचे हाड मोडलेला रुग्ण सायंकाळी दाखल झाला. हाडाच्या डॉक्टरांना कळविण्यात आले व त्यांनी औषधोपचार सुरू करायला सुचवले होते. ऑपरेशन करायला लागणार असल्यामुळे त्याच्या तपासण्यांची सुरुवातही झाली होती. अचानक रात्री साडेनऊ वाजता रुग्णाला मोठा हृदयविकाराचा झटका आला. ड्युटीवरच्या दोन डॉक्टरांनी प्रयत्न करूनही पाच मिनिटांत रुग्णाचे निधन झाले. या गोष्टीशी रुग्णालयाचा दुरांव्ययानेही संबंध नव्हता. आजार जुना असावा. पाचच मिनिटांत रुग्णालयाचे प्रमुख खोलीत हजर झाले. काय झाले आहे याची ते माहिती घेत असताना बाहेर नातेवाइकांची गर्दी जमलेली होती. त्यातील एक वयस्कर व तीन दांडग्या तरुणांनी रुग्णालय प्रमुखांना खोलीच्या दरवाजात जखडून सांगितले, आता तुझ्याकडे बघतो व तुझ्या सकट हॉस्पिटल जाळून टाकतोफ, असे धमकावले. केवळ नशीब जोरावर म्हणून रुग्णालयातील मदतनीसांचा जथ्था तिथे हजर असलेल्या नातेवाइकांपेक्षा जास्त संख्येने होता म्हणून बेदम मार न खाता सुटका झाली. तासाभरात सुमारे २०० जणांचा जमाव रुग्णालयात जमला. तोपर्यंत रुग्णालय प्रमुखांनी घडलेल्या वास्तवाचे सोप्या माहितीतून अंगावर आलेल्या चौघांचे मनाजोगते शंका निरसन केले होते. त्यांनाच बरोबर घेऊन २०० जणांच्या जमावाला ते सामोरे गेले आणि त्याच चौघांनी जमावाला शांत केले. रुग्णालय प्रमुखांना बोलण्याची गरजही पडली नाही. या दोन्ही प्रसंगात मी साक्षी होतो. दोन्ही प्रसंगानंतर आठवडाभर माझी झोपही उडली होती हेही नमूद करायला हवे. स्वाभाविकपणे डॉक्टरांवर, रुग्णालयांवर होणाऱ्या विविध हल्ल्यांच्या संदर्भात कोणतीही घटना पेपरमधे शांतपणे वाचताना, काही वेळा संबंधितांकडून माहिती घेताना याला कायद्याने काही आळा घालता येऊ शकेल का? हा विचार पुन्हा पुन्हा समोर येऊनही त्याचे उत्तर निदान माझ्या पुरते तरी नकारात्मक येते. कारण कोणत्याही प्रसंगात भावनिक कोंडी झालेल्या व्यक्तीची रागाची वाफ स्फोटातून बाहेर पडते. पण त्याच वाफेला रोजच्या वापरातील प्रेशर कुकरसारखे शिट्टी वाजणारे सेफ्टी व्हॉल्व असले तर स्फोट टाळण्याची किमान शक्यता निर्माण होते. टळतोच असे नाही.

कायदा आणि हिंसा

कोलकत्यातील कार रुग्णालयात जे घडले किंवा बदलापूर येथे शाळेतील घटनेतून जे सामोरे आले ते कठोर कायदा करून टळेल हा एक भ्रम ठरणार आहे. लाखो वर्षांत उत्क्रांती होत मानवाचा जन्म झाला तरीही ज्ञात इतिहासात हिंसा नसलेले एकही वर्ष गेलेले नाही. तसेच उत्क्रांतीतील जनुकातून लैंगिक प्रेरणा पिढ्यानपिढ्या चालू राहते हेही वैश्विक सत्य आहे. या दोन्हींवर संस्कारांमुळे थोडीशी मात करता येते एवढेच. पण आदिम प्रेरणा संस्कारांवर कधी मात करेल हे कोणीच सांगू शकत नाही. पोलीस हे संरक्षणाकरता असतात. पण मग लीसकस्टडीत झालेल्या बलात्कार किंवा कैद्यांचा मृत्यू होतो तेव्हा हे गृहीतक खोटे ठरते. अशिक्षित किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे हैवान बनून बलात्कार करतात, असा समज जेव्हा विविध देशांच्या राष्ट्राध्यक्षांवर असे आरोप केले जातात तेव्हा पूर्णपणे खोटा ठरतो. लैंगिक चाळे, विनयभंग, बलात्कार हे सारे हिंसेचे एक विकृत स्वरूप आहे. पण हिंसा हीच जर आदिम प्रेरणा असेल तर ती कठोर कायद्याने थांबेल हा भाबडेपणाच झाला. पुराणातील कथांपासून आजपर्यंत विनयभंग किंवा बलात्काराच्या घटना घडतात.

युद्धकाळात त्याचे पीक फोफावते. बांगला देशातील आणि हमासने केलेल्या अत्याचारातील घटना सोडून द्या, पण मणिपूरमध्ये काय झाले ते तर विसरू नका. २०१७ सालापासून केरळमधील सिनेसृष्टीत चाललेल्या विनयभंग व लैंगिक अत्याचारांच्या गोष्टीचा अहवाल आजच छापून आला आहे. तरीसुद्धा फास्टट्रॅक खटला व फाशी या गोष्टींचा वारंवार उल्लेख संतप्त जमाव करत राहतो. विनयभंग किंवा बलात्कार याला आता जातीजातीचे परिमाण किंवा धर्माच्या छटा मिळत आहेत ही तर फारच वाईट गोष्ट. लहान मुलांना गुड टच किंवा बॅड टच शिकवा हे वाक्य तसेच. जेव्हा या मुलांना घरातीलच व्यक्तीकडून बॅड टच अनुभवायला मिळतो तेव्हाही खोटे ठरते. अशावेळी मुलांना खोटे ठरवण्याची सरसकट पद्धत घरोघरी रूढ असते. कायदे हे मोडण्यासाठी असतात अशी भारतीय परंपरा आपण स्वातंत्र्य लढ्यापासून शिकलो आहोत.**अपघाती मृत्यूनंतर**-रस्त्यात चारचाकी वा ट्रकचालकाची कोणतीही चूक नसताना झालेल्या अपघातात तो सरसकट मार खातो. ट्रकखाली आल्यामुळे मृत्यू झाल्यास स्वतःचा जीव वाचवण्यासाठी ट्रक ड्रायव्हर सरसकट पळून जातात व नंतर पोलीस ठाण्यात हजर होतात. संतप्त झालेल्या व काबूबाहेर गेलेल्या जमावाने पोलीस चौकीवर हल्ला करून पोलिसांना जाळण्याचा प्रयत्न करणे हेही आपण दर आठवड्याला वृत्तपत्रातील फोटोत पाहतो. किमान शंभर पत्रकारांचा दरवर्षीचा मारहाणीत झालेला मृत्यू ही गेल्या दशकाने ठेवलेली नोंद आहे. गेल्या शतकांत वाचलेले एक विधान येथे नमूद करावेसे वाटते. मोटर खाली एखादी व्यक्ती येऊन एक्सिडेंट झाल्यावर जर ड्रायव्हरचा पाय एक्सिलेटरवर जात असेल तर ती अमेरिका आहे आणि जर त्याने ब्रेक दाबला तर तो देश युरोपमध्ये असावा. थोडक्यात ज्याला त्याला स्वतःचा जीव प्यारा असतो. थोडक्यात डॉक्टरांवरील हल्ले कठोर कायदा करून कधीच थांबणार नाहीत. पुण्याच्या ससून रुग्णालयाचे निघालेले धिंडवडे हे थेट प्रमुखापासून रक्त बदलणाऱ्या वॉर्ड बॉयपर्यंत पोहोचले होते. ललित पाटील पलायन हाही विषय जुना नाही. निवासी डॉक्टरांना मिळणारी अमानवी गलिच्छ निवासी व्यवस्था हा तर त्यांच्या दर दोन वर्षांनी होणाऱ्या संपाचा प्रमुख विषय.यातूनच गेलेले डॉक्टर रुग्णालयांचे प्रमुख बनतात तेव्हा ते का निब्बर बनतात हा खरा प्रश्न. तीच गोष्ट विनयभंग व बलात्काराची. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी बलात्कार झालेल्या पीडितेची तपासणी करताना टू फिंगर टेस्टफ, वापरू नये ती चुकीची आहे असा आदेश कोर्टातर्फे द्यावा लागतो आणि तो अजूनही पाळला जातो की नाही याची चौकशी अधिकाऱ्यांना माहिती नसते, तर कायदे कसले कसले करणार? आणि ते कोण व कसे राबवणार हा प्रश्न उभा राहतो. शेवटास एका नॅशनल चॅनलवर २० ऑगस्टला बदलापूर घटनेवर चर्चा करणाऱ्या दोन सुशिक्षित पण असंस्कृतफ महिलांतील झालेल्या भांडणाचा उल्लेख करतो. तीन वर्षे आठ महिने वयाच्या मुलीच्या आतड्यांपर्यंत जखमा झाल्या असे एक महिला दुसरीला खोट्या आक्रोशाने सांगत होती, तर दुसरी महिला तितक्याच आक्रोशाने तिच्यावर तुटून पडत होती. नाही नाही आतड्यापर्यंत आत काही गेले नाही. केवळ चार वर्षांच्या बालिकेच्या अंतर्भागाबद्दलचे हे आमच्या राजकीय स्त्री प्रवक्त्यांचे घोर अज्ञान. तर कायदे काय करणार? वाचकांनीच ठरवावे.

# प्रदूषण रोखण्यासाठी लोकसहभाग गरजेचा



वातावरणातील बदलांमुळे मुंबईतील प्रदूषण वाढले आहे. या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्याचे मुंबई महापालिकेचे विविध प्रकारच्या माध्यमातून प्रयत्न चाललेले असताना आता त्यावर आणखी प्रभावी उपाय म्हणून मुंबईत कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. खरे म्हणजे असे केल्याने प्रदूषण थांबणार आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. उलट त्यामुळे पैशांचा चुराडाच अधिक होईल. एरव्ही मुंबईत पावसाळ्याच्या दिवसांत चार महिने भरपूर पाऊस पडत असतोच. त्याने प्रदूषण थांबत नाही, तर आता कृत्रिम पाऊस पाडल्याने हे प्रदूषण थांबणार आहे का? हा प्रश्न आहे. याबाबत शासनाने प्रदूषण तज्ज्ञांचे मत जाणून घेतले आहे काय? तसे असेल आणि महापालिकेचा पैसा वाया जाणार नाही, हेही तपासून पाहिले पाहिजे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली तरी देशातील गोरगरिबांचे मुंबई शहर जगण्याचे ठिकाण आहे. केवळ गरीबच नव्हे तर चाकरमानी, विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, उद्योजक यांचेही मुंबई शहराशी नजीकचे नाते आणि त्यांचे व्यवहार अवलंबून असल्यामुळे मुंबईशिवाय ते राहू शकत नाहीत. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरावर विविध बाबतीत ताण आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत, इमारती बांधकामे थांबविण्याचे आदेश दिले होते. त्याचबरोबर, मुंबईतील बांधकामाच्या ठिकाणी धूळ व प्रदूषण नियंत्रणासाठी आखण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी मुंबई महापालिकेने वॉर्डस्तरावर करण्यास सुरुवात केली आहे. वॉर्डस्तरावर नेमण्यात आलेल्या विशेष पथकांकडून पाहणी होत असून मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न झाल्यास काम थांबविणे किंवा ते सील करण्यात येणार आहे.

असो. दिल्लीपाठोपाठ मुंबईतील प्रदूषणाचे प्रमाण वाढले, यात शंकाच नाही. मुंबईत आधीच लाखोंच्या संख्येने वाहने आहेत. शिवाय बाहेरून येणारी वाहने काही कमी होत नाहीत. या वाहनांमुळेही वातावरणातील हवेत प्रदूषणाचा फैलाव होत असावा, असे वाटते. वास्तविक मुंबईत विविध प्रकारच्या माध्यमातून जे प्रदूषण निर्माण होत आहे, ते थांबवणे हे महापालिकेसमोर आणि राज्य सरकारसमोर मोठे आव्हात्मक काम आहे. मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच पाहणी केली. त्यात रस्ते, पदपथ आणि धूळ आदी कामांची पाहणी केली. यामधून निर्माण होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रसंगी दुबईतील कंपनीशी करार करून कृत्रिम पाऊस पाडण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले. तसेच एका दिवसाआड म्हणजेच तिसऱ्या दिवशी मुंबईतील रस्ते धुऊन साफ केले जातील. त्यासाठी एक हजार टँकर भाड्याने घ्यावे लागतील, असेही त्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री जे काही म्हणत आहेत ते मुंबईकरांच्या दृष्टीने आणि मुंबईच्या आरोग्याच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. हे सर्व असताना मुंबईत जी विकासकामे सुरू आहेत, जसे मोठ्या इमारतींची कामे, इमारतींचे पाडकाम, मेट्रो रेल्वेची कामे व अन्य प्रकारच्या कामामुळे जी धूळ निर्माण होते, त्यातून निर्माण होणारे प्रदूषण आणि लाखो वाहनांच्या धूर आणि धुळीच्या कणांमुळे निर्माण होणारे प्रदूषण या सगळ्यांचा मनुष्य जीवनावर होणारा परिणाम किती घातक आहे, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. धूळ प्रतिबंधक उपाय करण्याची गरज तर आहेच, यात दुमत असण्याचे कारण नाही. प्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे. लोकांनीही आपापल्या पद्धतीने काळजी घेण्याची गरज तर आहेच. शिवाय महानगरपालिकेचे कर्मचारी येतील आणि स्वच्छता करतील, असे त्यांच्या भरवशावर न बसता आपला परिसर कसा स्वच्छ राहील, हे पाहिले पाहिजे. त्यासाठी त्यांना काळजी घ्यावी लागणार आहे. मुंबई महापालिका सर्व बागांमध्ये अधिकची झाडे लावणार आहे. नव्हे त्याची अधिक गरज आहे. या झाडांमुळे धुळीचे कण रोखता येतील, शिवाय कार्बन डायऑक्साईड अधिक निर्माण करण्याचे काम ही झाडे करतील. प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे, त्यासाठी विविध उपाय योजत आहे. रस्ते पाण्यामुळे साफ केल्यास धुळीचे कण उडणार नाहीत. हे सर्व असताना महापालिकेला मोठ्या खर्चाची तरतूद करावी लागणार आहे. मग त्यासाठी रस्ते धुण्यासाठी लागणारे टँकर, कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी होणारा खर्च सोसावा लागणार आहे. त्याचबरोबरीने आता मुंबईकरांनी प्रदूषण दूर व्हावे यासाठी सजग राहणे गरजेचे आहे.

# आजार आहेत आणि उपायही



जागतिक एड्स दिन १ डिसेंबरला पाळला जातो. यायोगे एड्ससारख्या जीवघेण्या आजाराप्रति जागृती निर्माण करण्याचे काम सातत्याने होत असले तरी अजूनही बरेच काम होणे गरजेचे आहे. दुसरीकडे थंडीचा काळ सुरू होत आहे. या काळात देशभर अस्थमाग्रस्त रुग्णांची संख्या वाढताना दिसते. वाढत्या प्रदूषणामुळे आता ही समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे याविषयीदेखील सविस्तर माहिती घ्यायला हवी.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशातल्या आरोग्य समस्यांचा गंभीर प्रश्न सर्वज्ञात आणि सर्वश्रृत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकड्या आरोग्यसेवा आणि आरोग्याप्रति दुर्लक्ष करण्याची समाजाची मानसिकता या दोन कारणांमुळे हा देश नानाविध आजारांचे आश्रयस्थान बनत आहे, यात शंका नाही. दिवसेंदिवस हा प्रश्न उग्र रूप धारण करत आहे. त्यामुळेच दर वर्षी गंभीर आजारांप्रति जागृती निर्माण करण्यासाठी ठरावीक दिवसांचे औचित्य साधले जाते. या पार्श्वभूमीवर १ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक एड्स दिनाचे महत्त्व खूप मोठे आहे.गेली अनेक वर्षी एड्सप्रती जागरूकता निर्माण करण्याचे काम होत आहे. या जीवघेण्या आजारामुळे केवळ बाधित व्यक्तीच नव्हे तर संसर्गाने जोडीदारही या आजाराला बळी पडू शकतो. परिणामस्वरूप संपूर्ण कुटुंबाला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो, हे आणि यासारखे अन्य धोके लोकांसमोर आणले जात आहेत. मात्र इतक्या वर्षांच्या प्रयत्नांनंतरही जनसामान्यांना या दाहक व्याधीचे पुरेसे ज्ञान मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच अजूनही बरेच काम बाकी आहे, असे यंदाच्या या दिनाच्या निमित्ताने म्हणावे लागेल. एड्सग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता याला कलियुगातील भस्मासूर म्हटल्यास वावगे ठरू नये.वास्तविक, एड्सपासून बचाव करण्यासाठी गर्भनिरोधके उपलब्ध असूनही जनजागरणाच्या अभावामुळे या सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर होत नाही. याबाबत देशातील तरुण पिढीशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. तसे प्रयत्न शासन आणि काही स्वयंसेवी संघटनांमार्फत केले जात आहेत. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे एचआयव्हीबाधित व्यक्ती साध्या आजारांनाही बळी पडते. शरीरातील प्रतिकार यंत्रणा मोडकळीला आणणाऱ्या या विषाणूंचा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश होण्याचे चार मार्ग आहेत. एक म्हणजे असुरक्षित शरीरसंबंध. दुसरा एचआयव्हीबाधित मातेकडून गर्भाला लागण होणे. तिसरा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा निर्जंतुक न करता पुनर्वापर आणि चौथा अपघातग्रस्त अथवा आजारी रुग्णावर शस्त्रक्रिया करताना एचआयव्हीचे विषाणू असणाऱ्या रक्ताचा पुरवठा होणे. या चार मार्गांनी एचआयव्हीचा प्रसार होतो.एचआयव्हीची बाधा झाल्यानंतर तीन ते सहा महिन्यांत रुग्णामध्ये तीव्र ताप येणे, विशेष कारण नसताना वजनात सात ते आठ किलोची घट होणे, सातत्याने जुलाब होणे, सांधेदुखी, डोकेदुखी, थकवा, गळ्यावर अथवा काखेत गाठी येणे, तोंडाच्या आतल्या भागात फोड आढळणे, टीबी, मेनींजायटिस, न्यूमोनिया, रेटीनायटिस, हर्पिस हे विकार उद्भवणे, रात्रीच्या वेळी दरदरून घाम फुटणे आणि पोटदुखी, उलट्या होणे अशी लक्षणे आढळतात. त्यामुळेच यासारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याची सजगता वाढणे गरजेचे आहे. खेरीज भारतामध्ये असुरक्षित शरीरसंबंधांमुळे एचआयव्हीचा प्रसार होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. एचआयव्हीबाधित व्यक्तीसाठी वापरलेल्या सुयांचा वापर निरोगी व्यक्तीच्या उपचारात केल्यास एचआयव्हीचा प्रसार होतो. त्यामुळे कोणतेही उपचार घेताना रुग्णाने नव्या सुईच्या वापरासाठी आग्रह धरायला हवा. अमली पदार्थ शिरेवाटे घेणारे व्यसनाधिन तरुणही एचआयव्हीच्या प्रसाराला बळी पडतात. हेरॉईन अथवा गर्दसारखे अमली पदार्थ शिरेवाटे घेण्याची पद्धत सध्या रूढ आहे. हे व्यसनाधीन तरुण एकमेकांच्या सुयांचा वापर करतात. असे करताना त्यांना सुया निर्जंतुक करून घेणे शक्य असतेच असे नाही. त्यामुळे बरेचदा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा पुनर्वापर होऊन एचआयव्हीचा प्रसार होतो.

विचारात घेण्याजोगा आणखी एक मुद्दा म्हणजे रक्तदान करताना अथवा रक्त स्वीकारण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी. एचआयव्हीबाधित व्यक्तीचे गाढ चुंबन घेतल्यानेही एड्सचा प्रसार होतो. विशेषत: एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या अथवा तिचे चुंबन घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडात जखमा असतील तर निश्चितच असा प्रसार होतो. दारूसारख्या अमली पदार्थांचे सेवन केल्यानंतर अनेकांना लैंगिक क्रियेत सहभागी व्हावेसे वाटते. अशा वेळी ते कंडोमचा वापर करतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे दारूचे व्यसन अप्रत्यक्षपणे एचआयव्हीच्या प्रसाराला कारणीभूत ठरते. असे असले तरी एड्सबाधित व्यक्तीला स्पर्श केल्याने, तिचे मलमूत्र हाताळल्याने, या व्यक्तीसोबत एकाच ताटात जेवल्याने, तिचे कपडे वापरल्याने अथवा सोबत वास्तव्य केल्याने या रोगाची लागण होत नाही. एचआयव्हीची बाधा आणि प्रतिबंध यासंबंधी योग्य वेळी माहिती न मिळाल्याने काही व्यक्तींना एचआयव्हीच्या बाधेला बळी पडावे लागले आहे.रोग आणि चर्चा करत असताना वाढत्या थंडीतील काही आजारांविषयी देखील सजग होणे गरजेचे आहे. सध्याचा काळ ऋतूबदलाचा आहे. वातावरणातील बदलामुळे या काळात अस्थम्याच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. या काळात अस्थम्याचा त्रास जाणवण्याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना श्वसनसंस्थेची ताकद कमी पडणे अथवा काही अडचणी जाणवणे. श्वासनलिका संवेदनशील असणाऱ्या रुग्णांना या दिवसात हा त्रास सोसावा लागतो. संसर्गामुळे संवेदनशील श्वासनलिका आकुंचन पावतात आणि अस्थम्याची लक्षणे जाणवायला लागतात. थंडी वाढू लागल्यानंतर वातावरणात परागकणांचे प्रमाणही वाढते. या दिवसात गवतफुलांचे प्रमाणही खूप जास्त असते. त्यामुळेच याची ॲलर्जी असणाऱ्यांना लगेच त्रास होण्यास सुरुवात होते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या काळात जमीन थंड राहते. साहजिकच गारव्यामुळे जमिनीलगत धुक्याची दुलई पसरते. ही बाबही अस्थम्याला कारक ठरते. खेरीज थंडीत हवेमध्ये अनेक दूषित कणांचा संचार असतो. प्रदूषणयुक्त वातावरणात असे घातक कण हवेत तरंगत राहतात.थंडीमध्ये पसरलेल्या धुक्यात हे कण अडकून राहतात आणि त्यांची बाधा होऊन श्वासनलिका प्रभावित होते.या समस्येचे आणखी एक कारण म्हणजे एरव्ही व्यायामाला अनुत्सुक असणारे लोकही थंडीच्या आल्हाददायक वातावरणात व्यायामासाठी बाहेर पडतात. मात्र त्यांच्या शरीराला व्यायामाची सवय नसते. त्यात वातावरणातील बदलाचा परिणाम होतो आणि व्यायामामुळे येणारा अस्थमा बळावतो. वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना अस्थम्याचा त्रास वेगवेगळ्या प्रकारे जाणवतो. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे शरीर विकसित होत असतानाच अस्थमा जडतो. म्हणजेच वृद्धावस्थेत अस्थमा मागे लागत नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. लहान मुलांना अस्थम्याचा जास्त धोका असतो. त्यांना मोठ्या माणसांसारखा दम लागत नाही, मात्र ती सतत खोकतात. सतत खोकला येणे हे अस्थम्याचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. मोठ्या माणसांना दम लागणे, छातीतून आवाज येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, श्वास अपुरा पडणे आदी लक्षणे जाणवतात. त्यातही पहाटेच्या सुमारास खोकल्याची तीव्रता वाढते.

एकंदरीतच अस्थमा हा त्रासदायक आजार असला तरी सध्या यावर अत्यंत परिणामकारक औषधोपचार उपलब्ध आहेत. यात श्वासावाटे घेता येणारी औषधे अधिक परिणामकारक सिद्ध होतात. औषधांचा इनहेल्ड डोस कमी लागतो. म्हणजेच तोंडाने दोन मिली औषध पोटात जात असेल तर श्वासावाटे दिल्या जाणाऱ्या औषधाचा २०० मायक्रोग्राम डोस पुरेसा असतो. याचे कारण औषध नेमकी गरज आहे तिथे पोहोचते. मात्र दुर्दैवाने आपल्याकडे श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या म्हणजेच इनहेल्ड औषधांप्रती हवी तेवढी जागृती झालेली नाही. आपल्याकडे आजही औषधे घेण्याची योग्य पद्धत अवलंबली जात नाही. अशा प्रकारे घेतल्या जाणाऱ्या इनहेलर्सची सवय लागू शकते असाही एक गैरसमज आढळतो. तो दूर करणे गरजेचे आहे.तोंडावाटे अनावश्यक प्रमाणात औषध पोटात जाते आणि काही परिणाम दाखवते. याचाच एक भाग म्हणून अशी औषधे घेतल्यानंतर हात थरथरणे, शरीरात कंप जाणवणे, अस्थिरता अथवा बैचेनी जाणवणे आदी त्रास सोसावा लागतो. मात्र श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या औषधांमुळे असा कुठलाही त्रास जाणवत नाही. या औषधांमुळे अस्थम्यावर लवकर नियंत्रण ठेवणे शक्य होते. थंडीच्या सुरुवातीच्या काळातच आपण या सगळ्यांची माहिती घेणे गरजेचे आहे. त्रास वा लक्षणांकडे लक्ष ठेवणे, गरज वाटताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे, औषधांचा पूर्ण डोस घेणे आणि आवश्यक ती पथ्ये पाळणे या नियमांचे पालन केल्यास अस्थमा रुग्ण या आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेऊ शकतात.-डॉ. दिलीप शिरसाठ

## जीवनाचे सार: चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, नातेवाईक-त्रयस्त, शोषण-पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक-संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्येपेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन-धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

२७ ऑगस्ट २०२३ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
नशिबावर सोडून दिलेले कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणी पार पाडताल. कामातील गती कायम राखल्याने यश मिळेल. समाजातील प्रतिष्ठेत वाढ होईल. नवीन संबंध फायदेशीर राहतील.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण
व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका. भाग्याचे पूर्ण सहकार्य आज लाभणार आहे.

कर्क :शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर
आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील.कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होऊन रूपरेषा आखली जाईल.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम
नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल. आळस सोडून द्या. स्थावर मालमत्तेचे काम पूर्ण होईल. संयम बाळगा.

कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. शुभ संकेत मिळाल्याने आपले मन उत्साहित राहील. आर्थिक लाभ भरपूर होईल. परमेश्वरावरील विश्वासात वाढ होईल.


तुळ: शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा: उत्तर
निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणींमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांशी वाद होण्याचा संभव आहे. हाती कमी पैसा असल्याने आपले काम अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल. अहारावर नियंत्रण असू द्या. सार्वजनिक कामात यश मिळेल.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
रोजगारामध्ये बदल किंवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल. जीवनसाथीच्या भावनेकडे दुर्लक्ष करू नका.

मकर :शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम
योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबंध दृढ होतील. व्यापारा स्पष्टपणा राखा. व्यापार नौकरीत इच्छेप्रमाणे उन्नती

## राशी भविष्य



होईल. वाचनाची गोडी वाढणार आहे.

कुंभ: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही. आपल्या योग्यतेचे मूल्यमापन होणार नाही. व्यक्तिगत समस्या निर्माण होईल.

मीन :शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण
प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. चोरी किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. व्यापारात घेतलेले निर्णय फायदेशीर असणार आहेत.

२५ नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, बुध, नेपच्यून व गुरूचा प्रभाव आहे. तुम्ही संवेदनाक्षम आहात. परिस्थितीच्या चढउताराचा परिणाम तुमच्यावर जास्त होतो. तुमची भावनिक आंदोलने सतत चालू असतात. वास्तपेक्षा कल्पनासृष्टीत तुम्ही जास्त रमता. त्यामुळे साहित्य, कलाक्षेत्रात तुम्ही नवनिर्मिती करू शकता. तुमच्याकडे असाधारण प्रतिभा आहे. जीवनात जे गूढ, अतर्क्य आहे त्याबद्दल तुम्हाला आकर्षण वाटते. ते ज्ञानाच्या कक्षेत आणण्यासाठी परलोकविद्या, ज्योतिष इ.चा अभ्यास करता. अपयशाने खचून जाऊ नका. औदासीन्य आल्यास नदीकिनारी समुद्रकिनारी जा. आत्मपरीक्षण करा. तुमचा उत्साह, उमेद परत मिळाल्याचा प्रत्यय येईल. मद्यपान, मादक द्रव्ये यामुळे निद्रानाश, मनोविकार उद्भवतील. व्यसनी मित्र टाळा. ध्यानधारणा नियमित करा.

कार्यक्षेत्र : कुणाच्याही मनोभूमिकेत प्रवेश करण्याच्या क्षमतेमुळे अभिनयकलेत वरचा पल्ला गाठाल. व्यक्तिवैशिष्ट्यांचे रेखाटन करण्याची कला नाटक, चित्रपट, दूरदर्शनसाठी लेखन करण्यास उपयुक्त ठरेल. मानसशास्त्राचा अभ्यास करून मनोविकारांची चिकित्सा करणारे मानसोपचार तज्ज्ञ वा कुटुंबकल्याण सल्लागार म्हणून काम करू शकाल. शीतपेये, पाणीपुरवठा, जहाजबांधणी इ. अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : स्वप्नाळू वृत्तीत रमण्यामुळे प्रियकराच्या स्वभावाबद्दलचा तुमचा अंदाज बऱ्याच वेळा चुकू शकतो. निवडीच्या वेळा इतरांची सल्ला घ्या. तुमच्या भावनांची जपणूक करणारा, तुमच्या मनोव्यथा समजून घेणारा जोडीदार तुम्हाला हवा असतो. मनाने कठोर व्यक्ती आवडत नाहीत. जून २१ ते जुलै २० दरम्यानच्या व्यक्तींशी सूर जुळेल.

वर्षफळ : जुन्या सहकाऱ्यांच्या कारवायांमुळे मनस्ताप होईल. जागा जमिनीच्या हस्तांतरणाची शक्यता आहे. डिसेंबर जानेवारी मध्ये कार्यक्षमता उंचावल्याबद्दल गौरव होईल. मार्च एप्रिल मध्ये नव्या योजनातून पैसा हाती येईल. मे जून मध्ये मित्रांचे गैरसमज दूर करण्यात वेळ जाईल. जुलै ऑगस्ट मध्ये सहचराचा सल्ला वेळोवेळी उपयुक्त ठरेल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये प्रकृती सांभाळा. किडनीचे विकार होतील.

महत्वाचे वर्ष : ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७०.

भाग्यरत्न : लसण्या

याच तारखेची व्यक्ती :
साधु वासवानी,
रा. रं. बोराडे, इम्रान खान

# ईर्टिका व मोटारसायकल अपघातात दोघे जागीच ठार





**जळकोट (प्रतिनिधी)** तालुक्यातील तिरुका येथील दोन युवक कडा महादेवाचे (ता. कंधार ) दर्शन करून परतत असताना ईर्टिका व मोटार सायकलची धडक होऊन दोघे जागीच गतप्राण झाले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तिरूका ता. जळकोट ( जि. लातूर ) येथील दोन युवक योगेश यशवंत जाधव व प्रेम दत्तात्रय मसुरे हे कंधार तालुक्यातील घागरदरा येथील कडा महादेवाचे दर्शन घेऊन मोटार सायकलने तिरुका या आपल्या गावाकडे परत येत असताना दिग्रस ते जांब (बु.) दरम्यान कंधारकडे जाणारी ईर्टिकाशी त्यांची समोरासमोर धडक होऊन दोघेही जागीच ठार झाले आहेत. जांब (बु.) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकाच्या ताब्यात दिल्यानंतर त्यांच्या मूळगावी तिरुका येथे रात्री अंत्यविधी करण्यात आला. दोन्ही युवकाच्या अचनाक जाण्याने तिरुका गावावर शोककळा पसरली आहे.

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२३/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार इश्वर विजयकुमार समगे रा. मल्लापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २०/०६/९९८६ रोजी मौजे मल्लापूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार इश्वर विजयकुमार समगे रा. मल्लापूर यांनी त्यांचा जन्म दिनांक २०/०६/१९८६ ची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २३/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २०/०६/१९८६ रोजी मौजे मल्लापूर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार इश्वर विजयकुमार समगे रा. मल्लापूर यांचा जन्म दिनांक २०/०६/१९८६ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मल्लापूर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२३/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार कालीदास लक्ष्मण पईतवार रा. गुडसूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०५/१९५१ रोजी मौजे गुडसूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार कालीदास लक्ष्मण पईतवार रा. गुडसूर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०५/०५/१९५१ ची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २३/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५/०५/१९५१ रोजी मौजे गुडसूर ता.उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार कालीदास लक्ष्मण पईतवार रा. गुडसूर यांचा जन्म दिनांक ०५/०५/१९५१ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुडसूर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

## नगर परिषद उदगीर

### जाहिर प्रगटन

उदगीर शहरातील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, खालील दर्शविलेल्या लोकांनी नगर परिषद उदगीर येथे नामांतर साठी अर्ज दाखल केले आहे. सदरच्या नामांतर बाबत कोणाचे उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत उजरदारी अर्ज न.प. कार्यालयात दाखल करावा मूदती नंतर उजरदारी अर्ज स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नांव | मालमत्तेचे तपशिल | चतुर्सिमा |
|---|---|---|---|
| १<br>४४७ | देणार : सुरेश बाळकृष्ण मुक्कावार इतर<br>घेणार : अक्षय अशोक काटमपल्ले | सर्वे नं. ३०४<br>४-३-७५४/२<br>पैकी | पुर्वेस- सुरेश मुक्कावारचे फ्लॅट<br>पश्चिम- ९ मी. रोड<br>दक्षिण - १२ मी रोड<br>उत्तर - ९ मी रोड |
| २<br>४४८ | देणार : धनराज नागोराव पाटील<br>घेणार:दिगांबर गोविंदराव बोरगावकर | सर्वे नं. २१९ पार्ट बी<br>प्लॉट नं. ६ | पुर्वेस- प्लॉट नं. ०७<br>पश्चिम- देवणे विक्री केलेला प्लॉट<br>दक्षिण - प्लॉट नं. ०१<br>उत्तर - २० फुटाचा रोड |
| ३<br>४४९ | देणार : उध्दवराव माधवराव हल्लाळे<br>घेणार: प्रभु उमराव हल्लाळे | सर्वे नं. २१८<br>प्लॉट नं. ८<br>२-२-२४७६ | पुर्वेस- प्लॉट नं. ०९<br>पश्चिम- सतीश कलकोटे<br>दक्षिण - प्लॉट नं. ०७<br>उत्तर - ६ मीटरचा रोड |
| ४<br>४५० | देणार : सुनिता अशोक कापसे इतर<br>घेणार: विजय शिवप्पा चिट्टे इतर | सर्वे नं. २७५<br>प्लॉट नं. १८<br>३-२-२२६४ | पुर्वेस- ३० फुटाचा रोड<br>पश्चिम- राधाकृष्ण प्रा. शाळा<br>दक्षिण - ३० फुटाचा रोड<br>उत्तर - प्लॉट नं. १७ |
| ५<br>४५१ | देणार : दिलीप नरसिंगराव रेकुळवाड<br>घेणार: गणेश प्रभाकर देवकत्ते | सर्वे नं. २१४<br>प्लॉट नं. ३१<br>२-२-२८८४ | पुर्वेस- प्लॉट नं. ३०<br>पश्चिम- ६ मीटरचा रोड<br>दक्षिण - प्लॉट नं. २८<br>उत्तर - प्लॉट नं. ३२ |
| ६<br>४५२ | देणार : सुर्यकांत माधवराव परगे<br>घेणार: जहीर अहमद महमद अहमद शेख | सर्वे नं. ३३२/४<br>प्लॉट नं.<br>२५,२६,२७ पै<br>४-१-१८१४पैकी | पुर्वेस- प्लॉट नं. २४<br>पश्चिम- प्लॉट नं. २७<br>दक्षिण - २० फुटाचा रोड<br>उत्तर - नागनाथ रामन्ना करेप्पा |
| ७<br>४५३ | देणार : व्यंकटेश मारोती बाचावाड<br>घेणार: विजयकुमार गुरपद्प्पा बिडवे | सर्वे नं. ३०९/२<br>प्लॉट नं. १८<br>३-३-१११५ | पुर्वेस- ४.५७ मीटरचा रोड<br>पश्चिम- प्लॉट नं. १३<br>दक्षिण - प्लॉट नं. १९<br>उत्तर - प्लॉट नं. १७ |
| ८<br>४५४ | देणार : शेख हबीब पि शेख मोहमदसाब<br>घेणार: रोशन खान खासीम खान पठाण | १-२-५<br>कपाळे गल्ली | पुर्वेस- प्लॉट नं. १०<br>पश्चिम- जहुर रहेमान<br>दक्षिण - २० फुटाचा रोड<br>उत्तर - जहुर रहेमान |
| ९<br>४५५ | देणार : सुशील शिवाजीराव पाटील<br>घेणार: गणेश मल्लीकार्जुन डाके | सर्वे नं. २१५<br>प्लॉट नं. १४<br>२-२-१६५१ पै | पुर्वेस- २० फुटाचा रोड<br>पश्चिम- गुंडरेची जमीन<br>दक्षिण - प्लॉट नं. १३<br>उत्तर - प्लॉट नं. १५ |
| १०<br>४५६ | देणार : मो. सिराज मैनोद्दिन मणियार<br>घेणार: हाश्मी सय्यद इसरारुल हक्क सय्यद अब्दुल हक्क | सर्वे नं. १६५/१<br>प्लॉट नं. १६<br>१-४-२०५९ | पुर्वेस- प्लॉट नं. १५<br>पश्चिम- प्लॉट नं. १७<br>दक्षिण - प्लॉट नं. २३<br>उत्तर - २० फुटाचा रोड |
| ११<br>४५७ | देणार : आनंद शरद शहा<br>घेणार: नालींद निर्मलकांत शहा | ५-२-४११<br>बालाजी मंदिर समोर | पुर्वेस- रामचंद्र शंकर मुक्कावार<br>पश्चिम- न.प. रस्ता<br>दक्षिण - रामचंद्र पेन्सलवार<br>उत्तर - वहाब यांचे गोदाम |
| १२<br>४५७ | देणार : शरद निर्मलकांत शहा<br>घेणार: नालींद निर्मलकांत शहा | ४-२-२६३<br>मारवाडी गल्ली | पुर्वेस- न.प. रोड<br>पश्चिम- बागडी घर वाकुडेचे घर<br>दक्षिण - न.प.रोड<br>उत्तर - रामकिशन मनियार |
| १३<br>४५८ | देणार : शरद निर्मलकांत शहा<br>घेणार: नालींद निर्मलकांत शहा | ५-१-४७<br>भाजी मार्केट<br>पत्तेवार चौक रोड | पुर्वेस- न.प. रोड<br>पश्चिम- विजयकुमार पाटील चे दुकान<br>दक्षिण- गायकवाड बाबुरावचे दुकान<br>उत्तर - नवनाथ सोनवणेचे दुकान |

उपमुख्याधिकारी
नगर परिषद, उदगीर

# विविध महादेव मंदिरात बिल्वार्चन करुन हजारो भाविक भक्तांनी घेतले दर्शन







**उदगीर (प्रतिनिधी)** श्रावण महिन्यातील चौथ्यासोमवारी उदगीर शहर व परिसरातील विविध महादेव मंदिरात शिवभक्तांनी बिल्वार्चन करुन शंभो महादेवाचे दर्शन घेतले. येथील उदागिरी बाबा किल्यात भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. देगलूर रोडवरील शिवहार महादेव मंदिरात भक्तांनी दर्शन घेतले. नेत्रगाव पंचक्रोशीत असलेल्या महादेव मंदिरात शिवभक्तांनी रुद्राभिषेक दर्शन घेतले. नळेगाव रोडवरील ओंकारेश्वर महादेव मंदिरात शिवपंचाक्षर जप करुन दर्शन घेतले. शेल्हाळ रोडवरील तपशाळे महादेव मंदिरात महिला पुरुष अबाल वृध्द भक्तांनी पायी चालत शंभो महादेवाचे दर्शन घेतले.


**टि.सी. हरवली आहे**
माझी कमलाकर बालाजी मुंडे या नावाची इ. १२ वी पासची टि.सी व इतर कागदपत्रे मनियार बिल्डींग जळकोट रोड ते जळकोट प्रवासात दि. २४/०८/२०२४ रोजी हरवली आहे.
जर कोणास साडल्यास संपर्क साधावा.
मो.नं ९१३०५९७६७२


# सकल हिंदू समाजाच्या हुंकार मोर्चात उदगीर बंद करून उदगीरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद



**उदगीर (प्रतिनिधी)** बांगलादेशामध्ये हिंदु समाजावर होत असलेले अन्याय, महिला, मुलींवर बलात्कार व त्यांची हत्या, धर्मस्थळे, मंदिरे यांची तोडफफोड करून तेथील अल्पसंख्याक हिंदुना देशातून पलयान करण्यास तेथील मुस्लिम लोकांच्या वतीने हल्ले करण्यात येत आहे. तेथे हिंदू समाज हा अल्पसंख्यक असल्यामुळे त्यांच्यावर वांरवार हल्ले होत आहेत. संपूर्ण देशभर यांचे पडसाद उमटत असल्यामुळे या निषेधार्थ उदगीर तालुनयातील सकल हिंदु समाजच्या वतीने उदगीर शहरात दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी हुंकार मोर्चा काढण्यात आला होता.मा.न्यायालयाचा शहर बंद न करण्याचे आदेश असून देखील उदगीर शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी स्वत: आपले दुकाने दिवसभरासाठी बंद ठेऊन या मोर्चामध्ये सामील झाले.

या हुंकार मोर्च्यामध्ये भाजपा,काँग्रेस, दोन्ही शरद पवार व अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष, मनसे,एकनाथ शिंदे व उध्दव ठाकरे गटाची शिवसेना आदी राजकीय,विश्व हिंदू परीषद, श्रीराम प्रतिष्ठाण, एबीव्हिपी, बजरंग दल,विविध हिंदुत्ववादी, सामाजिक ,व्यापारी संघटना, शासकीय, निमशासकीय कर्मचारी यांच्यासह हाजरोच्या संख्येने महिला व नागरीकांनी बांग्लादेशातील हिंदु समाजावर झालेल्या अन्याया विरोधात मोर्चाच्या वतीने विविध घोषणा देऊन निषेध नोंदवला.यात विशेष मोर्चातील सर्व नागरीकांनी डो्नयावर भगवी टोपी, हातात भगवा झेंडा,विविध निषेधार्थ नामफफलक घेऊन होते.

हा मोर्चा छ.राजर्षी शाहू महाराज चौक ते छ.शिवाजी महाराज चौक ते पोलिस ठाणे ते भाररत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, उमा चौक येथून परत महात्मा बसवेश्वर पुतळा नगर परिषद उदगीर येथे समारोप करण्यात. यावेळी पोलिस प्रशासनाकडून उपविभागीय पोलिस अधिकारी सोहेल शेख व शहर पोलिस निरीक्ष अभिषेक शिंदे यांनी व त्यांच्या टिमने हा हुंकार मोर्चा काढण्यासाठी पारवानगी दिली व कोणताही अनुचित प्रकार घडणार याचीही त्यांनी विशेष काळजी घेतली.


**टि.सी. हरवली आहे**
माझी सुमित्रा तातेराव दहिफळे रा. वडगाव (ता. जळकोट जि . लातूर ) या नावाची श्री संत गोविंद स्मारक विद्यालय वांजरवाडा ची १० वी नापासची मूळ टी. सी. मुखेड ते शिरूर ताजबंद प्रवास करताना हरवली आहे. सापडल्यास संपर्क करावा
मो. ७७७५०५६९१३


# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत समर्थ विद्यालयाचा संघ प्रथम



**उदगीर (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ विद्यालयाचा संघ १७ वर्ष वयोगटात प्रथम आला असून विभागीय स्पर्धेत हा संघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

लातूर येथील क्रिडा संकुलावर गुरूवारी जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. यात समर्थ विद्यालयाचे मृणाल नितीन पोद्दार, दिव्यांका अमोल भोसले, श्रुती गोविंद रंदवे, रूपाली कालिदास वाडकर व ज्ञानेश्वरी बालाजी गोदच्ची यांच्या संघाने १७ वर्ष वयोगटात जिल्हास्तरावर प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण, क्रिडा समन्वयक किरण हाळीघोंगडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले


उदगीरमनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# निष्ठावंत नेता हरपला



## डॉ. आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या ... देश पातळीवरील प्रथम पुरस्कार





कल्याण बाजार

मिलन नाईट बाजार

संपर्क

संपर्क

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागू.

यशवंत
मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

# सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदु समजुन आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या : ना संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर जिल्ह्याच्या नंतर आपले उदगीर शहर हे सर्वात मोठे असून उदगीर तालुक्यासह शहर व आजूबाजूच्या गावातील गोर - गरीब रुग्ण मोठ्या संख्येने या सामान्य रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येत असतात आता विविध आजारावरील औषधासोबत सोनोग्राफ्फी व एक्सरे सुविधा उपलब्ध असुन या सर्व सामान्य रुग्णांवर योग्य उपचार करून त्यांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन त्यांना उत्तम आरोग्याची सेवा द्या असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील सामान्य रुग्णालयात नव्याने उभारण्यात आलेल्या बाह्यरुग्ण (ओपीडी) इमारतीच्या उद्धाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, राहुल केंद्रे, बसवराज पाटील कौळखेडकर, रामराव बिरादार, रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर , प्रदीप ढेले, एम. एम पाटील, विकास जाधव, भरत चामले , समीर शेख, प्रवीण भोळे, बालाजी भोसले, शिवशंकर धुपे, श्याम डावळे, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, सुधीर भोसले, मनोज पुदाले, प्रकाश राठोड, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, रंजना चिघळे, ॲड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, रमेश शेरीकर, बसवराज रोडगे, गिरीष उप्परबावडे, गणेश गायकवाड, मुकेश भालेराव, संघशक्ती बलांडे, प्रदीप जोंधळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, सामान्य रूग्णालयात गेल्या अनेक वर्षापासुन रूग्णांना अडचण होत असल्याचे आपल्या निर्दशनास आल्याने २ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देवून या बाह्य रूग्ण विभागाची इमारत बांधली आहे. आता यापुढे कुठलाही रुग्ण आरोग्य सेवेपासुन वंचित राहणार नाही. भविष्याय वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या कामाचा ताण लक्षात घेवुन या सामान्य रूग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार असुन मतदार संघतील रूग्णांना पहिल्या आमदार फ्फंडातुन १२ रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या. या रुग्णवाहिकेचा लाभ अनेक गरजू रूग्णांना होत आहे.या इमारतीत असंसर्गजन्य रोग तपासणी विभाग, पुरुष वैद्यकीय विभाग व आयुष विभाग, स्त्री वैद्यकीय विभाग, शल्य चिकित्सा, कान - नाक - घसा विभाग, आदी विभाग रुग्णांच्या सेवेत सुरु करण्यात आले आहेत. या सामान्य रुग्णालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागासह सर्व जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यात येणार आहे. मागील काळात आपण आपल्या मतदार संघातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून गुडसुर, घोणसी, मंगरूळ, कौळखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले तर वाढवणा बु. येथे विशेष बाब म्हणून १५ कोटीचे ग्रामीण रूग्णालय उभारल्याने आता आपल्या भागातील रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न मिटणार आहे. भविष्यात उदगीर येथे मेडिकल कॉलेज उभारणार असल्याचा आपला माणस असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.या कार्यक्रमास सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व उदगीर शहर परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदयगिरी किल्यात श्रावण सोमवार निमित्य रक्तदान शिबिर ५१ रक्तदात्यांचे योगदान



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील उदगीरी किल्यात श्रावण सोमवार निमित्य उदागिर बाबा मठ संस्थानच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात एकुण ५१रक्तदात्यानी रक्तदान करुन रक्तदानाच्या राष्ट्रिय कार्यात सहभाग नोंदवला

श्रावणमासानिमित्त सोमवार दि. २६ ऑगस्ट रोजी श्री. उदागीर बाबा मठ संस्थान समाधी किल्ला उदगीर येथे महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्रात आले होते.या रक्तदान शिबिराचे उदघाटन उदगीर शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या हस्ते उदागिर बाबा महाराज यांचे प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले. मठ संस्थानच्यावतीने मठाधिश जयशगिर गुरु सतिषगिर महाराज यांचे हस्ते उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.यावेळी किरण महाराज,तेजस महाराज गोस्वामी,सोनू महाराज गोसावी उपस्थित होते.रक्त संकलन करण्यासाठी कै.नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेचे रक्त संकलन पथकांनी काम पाहिले या रक्तदान शिबिरात एकुण ५१ महिला पुरुष युवक रक्तदात्यांनी रक्तदान करुन रक्तदानाच्या राष्ट्रिय कार्यात सहभाग नोंदवला.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी भक्तगण अमोल भवाळ ,बालाजी पवार ,संतोष रावनकोळो , विजय कुमार चिखले ,संदीप उपरवाडे ,श्रीधर सावळे, वेंकट भुये, राजू रत्नपारखे, सचिन कारामुंगे ,रामकिसन नागरगोजे ,अमोल लोकरे ,आलोक नुत्ते आदीनी परिश्रम घेतले. तर समर्थ महिला भजनी मंडळ भजन सेवा केली.

# उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात

## *आकर्षक वाहन क्रमांकासाठी २८ ऑगस्टपर्यंत नोंदणीचे आवाहन*




**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर (एमएच ५५) येथेनवीन उप प्रादेशिक परिवहनकार्यालय सुरु झालेले आहे. या अंतर्गत उदगीर, अहमदपूर,जळकोट, देवणी, शिरुर अनंतपाळ तालुक्यातील नागरिकांना सेवा दिली जाणार आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयात दुचाकी, चारचाकी, परिवहन संवर्गातील तीन चाकी व परिवहन संवर्गातील चारचाकी व जड वाहनांसाठी नवीन वाहन मालिका संगणकीय वाहन ४.० प्रणालीवर दि. २८ ऑगस्ट, २०२४ रोजी दुचाकी मालिका चक५५वाहन क्रमांक ०००१ ते ९९९९, चारचाकी मालिका चक५५-अ वाहन क्रमांक ०००१ ते ९९९९, परिवहनसंवर्गातीलहलके चारचाकी वाहने व जड वाहने मालिका चक५५-इवाहन क्रमांक ०००१ ते ९९९९, परिवहन संवर्गातील तीन चाकी वाहने मालिका चक५५-उ वाहन क्रमांक ०००१ ते ९९९९

या मालिकेतील शासकीय नियमानुसार शुल्क भरुन घेणे चालू केले जाईल. ज्या वाहनधारकांना आपल्या वाहनास आकर्षक क्रमांक घ्यावयाचा आहे, त्यांनी २८ ऑगस्ट रोजी उदगीर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून आपले आकर्षक क्रमांक शुल्क भरुन आरक्षीत करुन ठेवावेत.

पसंतीचा नोंदणी क्रमांक घेण्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार नोंदणी क्रमांक काटेकोरपणे नेमून देण्यात येतील. अर्जासोबत केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५ (अ) मध्ये विहित केलेल्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल. अर्जदाराची ओळख पटविण्यासाठी अर्जदाराने त्याचे फ्फोटो ओळखपत्र उदा. आधार कार्ड / निवडणूक आयोगाचे ओळखपत्र / पासपोर्ट / पॅन कार्ड इत्यादीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. आकर्षक नोंदणी क्रमांक संगणकीय वाहन ४.० या प्रणालीवर देण्यात येत असल्याने अर्जासोबत वाहनधारकाचा वैध ई-मेल आयडी, आधार कार्ड क्रमांक व आधार कार्डला संलग्न असलेला वैध भ्रमणध्वनी क्रमांक, पीन कोड क्रमांक देणे बंधनकारक आहे. २८ ऑगस्ट, २०२४ रोजी आकर्षक क्रमांकासाठी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत दुचाकी, चारचाकी, परिवहन संवर्गातील तीन चाकी व परिवहन संवर्गातील चारचाकी व जड वाहनांसाठी अर्जासह राष्ट्रियकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft)स्वीकारला जाईल. धनाकर्ष (Demand Draft) हा Dy. Regional Transport Officer, Udgir या नावे काढण्यात यावा.

ज्या आकर्षक क्रमांकासाठी एकच अर्ज प्राप्त झाला असेल त्या अर्जदारास त्याच दिवशी आकर्षक नोंदणी क्रमांक दिला जाईल. मात्र एकापेक्षा अधिक अर्जदारांनी पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी अर्ज केल्यास अशा प्रकरणी अर्जदारांनी कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत निर्धारित शुल्काचा धनाकर्ष (Demand Draft) व दुसरा जास्त रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) बंद लिफ्फाफ्यातसादर करावा. जो अर्जदार दुसरा धनाकर्ष (Demand Draft) सर्वात जास्त रक्कमेचा सादर करेल त्या अर्जदारास पसंतीचा क्रमांक देण्यात येईल. उर्वरित अर्जदारांना त्यांचे धनाकर्ष (Demand Draft) त्वरीत परत देण्यात येतील. आकर्षकक्रमांकआरक्षित केल्यानंतर ३० दिवसाचे आत वाहनधारकांनी वाहनाची नोंदणी करणे बंधनकारक आहे. आकर्षक नोंदणी क्रमांक दरवाढी संदर्भात शासनाने ३ डिसेंबर, २०२० रोजी जारी केलेल्या अधिसूचना प्रक्रियेच्या आधिन राहून दुचाकी, चारचाकी, परिवहन संवर्गातील तीन चाकी व परिवहन संवर्गातील चारचाकी व जड वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरु करण्यात येत आहे.

# श्रावण मासनिमित्य कपाळेश्वर महादेव मंदिरात लक्ष बिल्वार्चन सोहळा

## डॉ.राजशेखर शिवाचार्य यांचे दिव्यसानिध्य



**उदगीर (प्रतिनिधी)** श्रावण मासनिमित्य कपाळेश्वर महादेव मंदिरात ष.ब्र.डॉ.राजशेखर शिवाचार्य स्वामी महाराज यांच्या उपस्थितित लक्ष बिल्वार्चन सोहळा संपन्न झाला.

श्रावण मास निमित्य उदगीर येथील कपाळे गल्ली येथील पुरातन कपाळेश्वर महादेव मंदिरात हिरेमठ संस्थान बेंबळखेड, गोरठा बिदर (कर्नाटक) चे मठाधिश श्री.श्री. ष.ब्र. डॉ.राजशेखर शिवाचार्य स्वामी महाराज यांच्या दिव्य सानिध्यात औम नम शिवाय षडाक्षरी पं श्रावणमास शिवधर्म दर्शन व आशिर्वचन,श्री सिध्दांत शिखामणी ,परमरहस्य वचनामृत, सामुहिक लक्ष बिल्वार्चन सोहळा रविवार दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न झाला.या वेळी एक हजार महिला पुरुष युवक,युवती अबालशृध्द लक्ष बिल्वार्चन सोहळ्यात सहभागी झाले . यावेळी यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी नगर सेवक मनोज कपाळे,तृप्ती प्रशांत सोलापुर मठ बेंगलूरु, शि.भ.प.उध्दव महाराज हैबतपुरे, मनोहर पाटिल भोपणीकर, सुशिलकुमार जिवणे, सुभाष शेटकार, उमाकांत देवणे,शि.भ.प.सौ. अनिता शिवानंद हैबतपुरे अदी उपस्थित होते. आपल्या आशिर्वचनात डॉ.राजशेखर शिवाचार्य स्वामी महाराज म्हणाले की, शिवपंचाक्षरी महामंत्र लक्ष बिल्वार्चनाने सात जन्माचे पाप नष्ट होऊन सर्व सौभाग्य प्राप्त होते हे शिवपंचाक्षरी महामंत्राचेमहत्व असल्याचे सांगीतले. महामंगलआरती होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयकुमार स्वामी, मनोहर स्वामी,गंगाधर बिरादार,शिवशंकर मारवाडे, उमाकांत देवणे, सुभाष ख्याडे, राचप्पा कपाळे, मल्लिकार्जून विरकपाळे,अशोक कपाळे,मंगेश कपाळे,संतोष हलमंडगे, सुनिल कपाळे, शिवराज कपाळे, शिवकुमा ख्याडे, कल्याण कपाळे, विनोद सुरशेट्टे, बंटी फुलारी, अनिल कामण्णा, अमित कामण्णा, सुभाष कपाळे, संजय कपाळे, बालाजी कपाळे, बालाजी मुतंगे, अरविंद मुतंगे, गुरुनाथ सुरसट्टे, रविंद्र सुरसट्टे, रमाकांत विरकपाळे, महेश कपाळे, अमोल कपाळे, संजय कपाळे, शशिकांत फुलारी, संजय हलमंडगे, शालिवान डोंगरे, गुरु लद्दे, शिवप्रसाद आडे, मंगेश आडे, नितीन आडे, महादेव मुतंगे, प्रल्हाद बिरादार, बस्वराज आडे, महादेव नागलगावे, अमर जिरगे, महादेव कपाळे, अभिजीत कपाळे, निलेश देशमुख, संगम सुरशेट्टे, परमेश्वर सुरशेट्टे, दिपक कपाळे, श्रीमती लक्ष्मीबाई पांढरे, ताराबाईमोदी, कल्पनाताई कपाळे, वेदनाताई कपाळे , सरोजीनीताई कपाळे , मुद्रीकाताई पाटील , अनिताताई हैबतपुरे, विजयाताई निलंगे, महानंदाताई आडे, शांताताई कामन्ना, मनिषाताई ख्याडे, संगीताताई, गंगाधर पाटील, शिवा डोंगरे, महेश देशमुख, संतोष फुलारी, शिवा लदाडे , गिरीधर धुमाळे आदिनी परिश्रम घेतले.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे समर्थ विद्यालयात उद्धाटन



**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले.

उद्धाटक व अध्यक्ष म्हणून संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसूरे, तालुका क्रीडा संचालक कोल्हे आदींची प्रमुख उपस्थिती होती. विविध वयोगटातील शालेय मुले, मुली २६ व २७ ऑगस्ट २०२४ या दोन दिवसात व्हॉलीबॉल स्पर्धा खेळणार आहेत. सोमवारी मुलींचे संघ खेळविण्यात आले. १४ व १७ वर्ष वयोगटात उदगीर येथील आनंदी पब्लिक स्कूल प्रथम तर १९ वर्ष वयोगटात जयहिंद पब्लिक स्कूल प्रथम आला आहे. हे दोन्ही संघ जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत खेळणार आहेत. प्रास्ताविक प्रा. एम. व्ही. स्वामी यांनी केले. सुत्रसंचालन रसूल पठाण यांनी तर आभार अमर जाधव यांनी मानले. मंगळवारी मुलांचे व्हॉलीबॉल सामने रंगणार आहेत. तरी क्रीडा प्रेमींनी उपस्थित राहणार असे आवाहन आयोजक संस्थेचे क्रीडा संचालक किरण हाळीघोंगडे यांनी केले आहे.